मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

१९५९

अनुक्रमणिका

डिसेंबर १९५९

अंकातील लेखक व कवि

डॉ. वा. वि. मिराशी
डॉ. अ. ना. देशपांडे
म. ना. लोही
पु. य. देशपांडे
मा. गो. जामदार
शं. श्री. वाशीकर
राजामुकुंद
विमलाबाई देशपांडे

मूल्य ८ आणे

युगवाणी

पादक: पु. य. देशपां

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें)

युगवाणी

डिसेंबर १९५९

संपादक-मंडळ

संपादक : पु. य. देशपांडे

सदस्य : गो. रा. दोडके

प्र. वा ऊर्ध्वरेषे

पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

* *

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १४] [अंक ९

कला : जीवन समीक्षा

डिसेंबर १९५९

संपादकीय

' गेली ज्योत विझोनिया '

आपला देश सांप्रत फार भयानक संकटात सापडला आहे. या संकटाच्या सर्व अंगोपांगांची असावी तशी जाणीव मोठमोठ्या नेत्यांनाहि पुरेशा प्रमाणात आहे, असे म्हणता येत नाही. अभेद्य व अनुल्लंघनीय मानल्या गेलेल्या हिमालयाच्या उत्तरेकडून भारतावर कम्युनिस्ट चीनचे आक्रमण सुरू झाले आहे. भारताचा ' मानदंड 'हि हादरू लागला आहे. बाहेरून अचानकपणे आलेल्या या भीषण संकटाला थोपवून धरण्यासाठी व याचे निराकरण करण्यासाठी ज्या सामर्थ्याची देशांत आवश्यकता आहे तिचा अभाव सर्व विचारवंतांना आता बराच जाणवू लागला आहे. लष्करी सामर्थ्य, राजकीय सामर्थ्य, आर्थिक व औद्योगिक सामर्थ्य आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील मैत्रीचे सामर्थ्य, अशा सर्व प्रकारच्या सामर्थ्यांच्या बाबतीत आपण किती दुर्बल आहोत, याची यथार्थ कल्पना करून घेऊ लागताच, विचारी माणसांच्या सर्वांगावर शहारे उभे राहतात.

स्वातंत्र्यपूर्व कालांतील दिवस आठवले की, असे वाटू लागते की, तेव्हा काय होते, काय अपेक्षिले होते आणि आता काय आहे, काय घडत आहे ? यांच्यात काही कार्यकारणभावाचे सूत्र तरी आहे का ? स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकारणाचे व समाजकारणाचे आध्यात्मीकरण करण्याचे ते धीरोदात्त प्रयत्न, ध्येयप्राप्तीसाठी प्राण पणाला लावण्याची असंख्य सामान्यातहि प्रदीप्त होऊ लागलेली ती तेजस्वी ज्योत, आज कुठे आहे ?

आज ती ज्योत कुठेच दिसत नाही. ती कायमची विझली का ? ती कायमची विझणे शक्य नाही, अशी आमची श्रद्धा आहे. ती भारतीय अंतः-

करणाच्या आतील गाभाऱ्यात अद्यापहि, मंदमंदपणे का होईना, तेवत आहे. पण इतिहासाने त्या ज्योतीचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य ज्यांच्या हाती दिले त्यांनी गेल्या दहाबाराच्या वर्षांच्या अवधीत ज्या बाह्य झगझगाटाच्या गोष्टीवरच बेसुमार भर दिला त्यामुळे त्या तेजस्वी ज्योतीवर सर्व बाजूंनी आज दाट काजळी पसरलेली आहे. तिचा प्रकाश त्यामुळे लुप्तप्राय झाल्यासारखा दिसत असला तरी भारतीय अंतःकरणातील आत-आतल्या गाभाऱ्यात ती अद्याप धुगधुगत आहे. प्रश्न आहे तो नवी ज्योत लावण्याचा नसून पुरातन, सनातन, नंदादीपवत् ज्योतीवर आलेली काजळी धैर्याने, कणखरपणाने खरडून काढण्याचा आहे. ही काजळी खरडून काढताना अनेकांचे हात पोळतील, भाजतील, भस्मसात होतील. तरीहि हे करणे आता क्रमप्राप्त झालें आहे. भारताचे उज्ज्वल भवितव्य साकारण्यासाठी वैश्विक महायज्ञाच्या होमकुंडात अनेकांच्या प्राणाहुति पडल्याशिवाय भारताच्या सनातन-नित्यनूतन सांस्कृतिक जीवनाची अमरज्योत वर उसळून येणार नाही.

"···गेली ज्योत विझोनिया तरि पुन्हा
येईल ती आतुनी
मंत्राचा सगळा प्रभाव परि हा
नाहीत होते कुणी--"

--ही कै. अण्णाजी वोवडे यांची प्रतिभाशाली वाणी खरी करून दाखविण्याची वेळ आज आली आहे. मंत्रद्रष्टया होत्यांना जागविण्याचा हा काल आहे. होते दिसत नसले तरी मंत्ररूपाने ते कायम आहेत. मंत्ररूपाने ते अमरच आहेत. मंत्रशक्ति चेतविण्याच्या प्रक्रियेतूनच असंख्य होते या पुण्यभूमीच्या कणाकणातून वर उसळून येतील.

यंत्रयुग आणि मंत्रयुग

आधुनिक युग हे विज्ञानजन्य यंत्रयुग आहे, असे अट्टाहासाने सांगण्यात येते. पण यंत्रांची शक्ति, आरंभी मानवी अंतःकरणात प्रस्फुरित झालेल्या मंत्रात असते, याचा बहुतेकांना विसर पडत चालला आहे. पिसाच्या झुलत्या मनोऱ्यावर उभे राहून गॅलिलिओने लहान-मोठया वजनांच्या अनेक वस्तु एकदम खाली सोडल्या आणि त्या सर्व एकाच क्षणी जमिनीवर येऊन आदळल्या. त्या आदळण्याच्या दणदणाटातून आधुनिक विज्ञान व यंत्रयुग आकारास आलें. मोठया वजनाची वस्तु आधी कोसळेल आणि हलक्या वजनाची वस्तु मागाहून कोसळेल अशा अरिस्टॉटल्पासून रूढ झालेल्या समजुतीला ख्रिस्ती धर्माच्या राजसिंहासनावरहि प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. या प्रतिष्ठेच्या, गॅलिलिओने प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवून, चिंधडया उडविल्या. निसर्गाला, प्रकृतीला लहान-मोठी वजने

सारखीच. लहान-मोठा, हलका-वजनदार, सामान्य-असामान्य, कनिष्ठ-श्रेष्ठ, हे भेदभाव वैश्विक प्रकृतीच्या हिशेबी नाहीत, ते विकृत मानवी बुद्धीच्या भ्रमाचे बुडबुडे आहेत, हे वैश्विक प्राकृतिक सत्य गॅलिलिओच्या अंत:करणात प्रथम अभिमंत्रित झाले आणि नंतरच प्रत्यक्ष प्रयोगाची कल्पना त्याच्या मनात साकारली. या प्रत्यक्ष-प्रयोग-प्रक्रियेने शतकानुशतके मानवी मनात घर करून वसलेले भ्रमाचे बुडबुडे एका टिचकीसरशी तडातड फुटले. आणि त्यासरशी एक नवे विज्ञानयुग सर्व जगावर आपला प्रभाव पाडू लागले.

पण विज्ञानाने निर्माण केलेल्या यंत्रांचा समाजावर व मानवी मनावर जसजसा अधिक प्रभाव पडू लागला व विज्ञानाचे मंत्र दुर्लक्षित होऊन जड यंत्रांची मोहमयी मायाच जगाला जसजशी घेरू लागली तसतसे खरे अभिमंत्रित विज्ञानयुग लवकरच संपुष्टात येऊन खोट्या यंत्रयुगात त्याचे भ्रष्टीकरण व भेसुरीकरण होऊ लागले. यंत्रे आणि यंत्रनिर्मित विविध जड वस्तूंची प्राप्ति, त्यांचा संचय, त्यांची समृद्धि आणि या समृद्धीच्या संरक्षणार्थ संहारकारी यंत्रांनाच प्राधान्य प्राप्त होऊ लागले. मंत्र गेले, यंत्रे आली आणि आरंभीच्या मंत्रांनी काही काळ विमुक्त झालेले मानव यंत्रांच्याच भेसुर गुलामगिरीत गुरफटले गेले. स्वातंत्र्य, समता, बंधुभावही विज्ञानजन्य मूल्यत्रयी मेली आणि साम्राज्यशाही, झोटिंगशाही, सर्वाधिकारशाही ह्या आसुरी शक्ति जागतिक वर्चस्वासाठी प्रचंड संहारक यंत्रांच्या साहाय्यानेच पुष्ट होऊ लागल्या. मंत्रशक्तीने प्रस्फुरित केलेली यंत्रे व यंत्रस्वामी हे भस्मासूर बनले, आणि वैज्ञानिक यंत्रवेत्यांचेच गळे दाबून त्यांना आपल्या आसुरी संहारक कार्यासाठी ते राबवू लागले. आज स्वातंत्र्य-समता-बंधुभावनिष्ठ असे विमुक्त वैज्ञानिक विस्मृत होऊन बसले आहेत आणि अभिमंत्रित विज्ञानाला आसुरी शक्तीचे दास्यत्व पत्करणे आज भाग पडले आहे. विज्ञानाचे सर्व मंत्र शापित होऊन यंत्रांचे भस्मासुर समग्र पृथ्वीतलावर नंगा नाच करू लागले आहेत. या भस्मासुराला मोहित करणाऱ्या आणि त्याला त्याच्याच शक्तीने जाळून भस्म करणाऱ्या विश्वमोहिनी मंत्राची, विश्वमोचनासाठीच आज आवश्यकता निर्माण झाली आहे. यंत्रयुगाला ठार करून नव्या मंत्रयुगाची उष:प्रभा क्षितिजावर प्रकाशू लागल्याशिवाय प्रलयकारी संहारातून मानवजातीची सुटका होणे आता शक्य नाही.

नव्या मंत्रयुगाचे स्वरूप

आता अपरिहार्य भासू लागलेल्या या नव्या मंत्रयुगाचे स्वरूप कसे असणार याची सर्व सर्जनशील साहित्यिकांनी, कलावंतांनी व विचारवंतांनी सुस्पष्ट जाणीव करून घेणे अगत्याचे झाले आहे. किंबहुना, आसुरी भस्मासुरांचे व

अनुक्रमणिका

त्यांच्या गणंगांचे मनोविनोदन, असे जे हिडिस रूप साहित्य-कलादिकांना सांप्रत येऊ लागले आहे ते नष्ट करून मानवी सर्जनशीलतेला नव्या प्रगतीची दिशा स्पष्ट दिसू लागल्याशिवाय साहित्य, कला व संस्कृति या शब्दातील प्राणशक्तिच नष्ट होण्याची वेळ आता आली आहे.

आधुनिक विज्ञानाचे यथार्थरूप काय व त्याची मानवी संस्कृतीला निश्चित व शाश्वत स्वरूपाची देणगी कोणती, याचे आकलन झाल्याशिवाय प्रगतीच्या नव्या क्षितिजांचे दर्शन घडणे शक्य नाही. उत्पादक वा संहारक अजस्र यंत्रे, ही आधुनिक विज्ञानाची महत्त्वाची देणगी नसून, प्राकृतिक घटनाकडे पूर्वग्रहशून्य, अविवश व साक्षीवृत्तीने पाहण्याची दृष्टि, हीच आधुनिक विज्ञानाने मानवी संस्कृतीला दिलेली सर्वश्रेष्ठ अशी देणगी होय. वैज्ञानिक वा शास्त्रीय विचार-पद्धति, असेहि या देणगीचे वर्णन करण्यात येते. पण हे तितकेसे निर्दोष नाही. समग्र विश्वाकडे आणि मानवजातीकडे पूर्वग्रहशून्य, अविवश, अतिविशुद्ध व अतिसूक्ष्म साक्षीवृत्तीने पाहण्याची दृष्टि वैदिक दार्शनिकांनी हजारो वर्षापूर्वी मानवांना दिलेली आहे. ही मानवजातीला भारताकडून मिळालेली अतुलनीय व अनन्यसाधारण अशी सांस्कृतिक देणगी आहे. हेच आपले सर्वांत अधिक मोलाचे असे सांस्कृतिक मानधन आहे. पण वैदिक दार्शनिकांनी दिलेली ही दृष्टि बाह्य प्राकृतिक घटनावर केंद्रित करण्याचे टाळून, मानवी अंतःकरणातील आंतरिक घटनावरच ती नित्य केंद्रित करणे आणि बाह्य प्राकृतिक वा लौकिक घटनांना सदा तुच्छ लेखीत राहणे, असे जे रूप वैदिक दार्शनिक दृष्टीला कालाच्या ओघात प्राप्त झाले त्यामुळेच भारत आपल्या सांस्कृतिक मानधनाचे संरक्षण व संवर्धन करण्यास हळूहळू अधिकाधिक असमर्थ बनत गेला आणि पुढे बाहेरून येणाऱ्या आक्रमणांना बळी पडला. आणि शेवटी विज्ञानाने समर्थ बनविलेल्या ब्रिटिश साम्राज्यशाहीची केवळ राजकीय व आर्थिकच नव्हे, तर सांस्कृतिक गुलामगिरीहि पत्करण्याचा लाजिरवाणा प्रसंग भारतावर कोसळला. या अधः-पाताला आळा बसविण्याचे कार्य आध्यात्मिक पुनरुत्थानाचे आन्दोलन करणारे राजा राममोहनराय, ब्राह्मो समाजादि नवीन संस्था, श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, लोकमान्य टिळक व महात्मा गांधी, इत्यादि आधुनिक पुरुषश्रेष्ठांनी व अन्य संतसत्पुषांनीच केले. भारतीय स्वातंत्र्याचे विराट आन्दोलन हे या नवीन आध्यात्मिक पुनरुत्थानाचेच एक आविष्करण होते, ही गोष्ट ऐति-हासिक पुराव्यानिशी सिद्ध करता येते. नव्या मंत्रयुगाचे स्वरूप आधुनिक भारताच्या या आध्यात्मिक पुनरुत्थानाच्या स्फूर्तीतच दडलेले आहे.

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवभारताच्या आध्यात्मिक पुनरुत्थानाची ही मूळ स्फूर्ति विस्मृत झाली. आणि आर्थिक, राजकीय व औद्योगिक क्रांतीच्या पाश्चात्य

विचारप्रणाल्यांनी या देशात धुमाकुळ माजविण्यास प्रारंभ केला. या धुमधामीत मूळ आध्यात्मिक स्फूर्तीवर आधारलेली धार्मिक, नैतिक व सांस्कृतिक जीवनमूल्ये जमीनदोस्त झाली. आपल्या राजकीय स्वातंत्र्याचा नवी आर्थिक व सांस्कृतिक गुलामगिरी पत्करण्याकडे दुरुपयोग करण्यांत आला. परिणाम हा झाला की, आज, केवळ बारा वर्षांच्या अल्प काळांत, आपले राजकीय स्वातंत्र्यहि संकटात सापडलेलें आपल्याला दिसत आहे !

नव्या सांस्कृतिक व्यासपीठाची आवश्यकता

आध्यात्मिक व सांस्कृतिक जीवनमूल्याकडे दुर्लक्ष करण्यामुळे कोणती दुर्दशा देशावर ओढवली जाते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आमचा स्वातंत्र्योतर कालातील केवळ एक तपाचा नादान इतिहास.

जे होऊ नये तेच घडले. याचे मुख्य कारण स्वातंत्र्याच्या आन्दोलनाला जी आध्यात्मिक पुनरुत्थानाची स्फूर्ति कारणीभूत झाली होती तिची विस्मृतिच नव्हे तर कुचेष्टा आणि आसुरी यंत्रयुगाचे अंध, निर्नैतिक व निर्बुद्ध अनुकरण.

आधुनिक विज्ञानाच्या यथार्थ रूपाचे व त्याच्या महत्त्वाच्या देणगीचे मूल्यमापन करण्याची वेळ आता आली आहे; सांप्रतच्या भयानक संकटानेच ही कामगिरी आमच्यावर लादली आहे. बाह्य व जड प्राकृतिक घटनाकडे पूर्वग्रह-शून्य, अविवश व साक्षीवृत्तीने पाहण्याची दृष्टि हीच आधुनिक विज्ञानाची सर्वश्रेष्ठ व शाश्वत महत्त्वाची देणगी आहे. बाह्य प्राकृतिक घटना तुच्छ लेखन केवळ मानवाच्या आंतरिक घटनावरच साक्षी वृत्ति केंद्रित करणे, हे वैदिक दार्शनिक दृष्टीचे उद्दिष्ट नसताहि, तेच सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट आहे असे मानून ज्यांनी वैदिक जीवनमूल्यांच्या संरक्षणाकडे व संतत संवर्धनाकडे दुर्लक्ष करण्याची प्रथा या देशात रूढ केली त्यांनीच हा देश दुर्बल व सामर्थ्यशून्य करून सोडण्याचे पातक केले आहे. हे जुने पापी व आता विद्यमान जडवादी यंत्रयुगाचे मंत्रशून्य, आध्यात्मिकताशून्य व नैतिकताशून्य असे अंध व निर्बुद्ध अनुकरण आरंभून ज्यांनी, स्वतंत्र भारताला गेल्या दहाबारा वर्षांच्या अल्पावधीतच महाभयानक संकटांच्या तोंडात आणून टाकले, ते हे नवे पापी, यांना निर्घृणपणे बाजूस सारून, सनातन व नित्यनूतन अशा सर्वांगीण वैदिक सांस्कृतिक जीवनदृष्टीला धैर्याने उजळा देऊ शकणारे नवे नेतृत्व भारतात आता आकारास आणले पाहिजे. मानवाच्या अंतःकरणातील आंतरिक घटनांना बाह्य प्राकृतिक घटनाइतकेच महत्त्व प्रदान करणारी, आणि क्षुद्र जडद्रव्याच्या कणाकणातून केवळ प्रलयंकारी संहारक शक्ति निर्माण करीत राहण्याऐवजी सर्व जडाचे आकलन करू शकणारी अशी जी मानसिक व आध्यात्मिक चैतन्यशक्ति तिचा सर्जनशील नवनवा आविष्कार करून

जड यांत्रिक शक्तीला हतप्रभ करू शकणारी अशी तारक शक्तिशालि दृष्टि जे आत्मसात करू शकतील तेच भारताचे व अंतिमतः सर्व जगाचे नवे नेतृत्व करण्यास समर्थ ठरतील.

चैतन्यशक्तीचे मंत्र-तंत्र आत्मसात करण्यास एक प्रकारचे वातावरण आवश्यक असते. हे असे वातावरण निर्माण करण्याचे कार्यच आज सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे झाले आहे. हे वातावरण निर्माण करण्यासाठीच आज भारतात एका नव्या विशाल व स्वतंत्र अशा सांस्कृतिक व्यासपीठाची आवश्यकता आहे. राजकारण, अर्थकारण, समाजकारण इत्यादि सर्व कारणावर आपला प्रकाश व प्रभाव पाडू शकेल असे हे सांस्कृतिक व्यासपीठ असले पाहिजे. हे प्रतिभेचेच कार्य असल्यामुळे साहित्य, कला व संस्कृति यांची जोपासना करणाऱ्या सर्व साहित्यिक संस्थांनी असे हे नवे सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्यासाठी आता कंबर कसली पाहिजे. ही केवळ संकटात सापडलेल्या भारताची तात्पुरती गरज नसून ती एक जागतिक आवश्यकता आहे. सर्व देशात अशी नवी सांस्कृतिक व्यासपीठे आकारास आली पाहिजेत. आणि या सर्व देशादेशातील व्यासपीठांच्या सहकार्याने एक जागतिक व्यासपीठ आकारास आले पाहिजे. असे झाले तरच परमाणुस्फोटकांच्या प्रलयकारी महायुद्धापासून व मानवी संस्कृतीच्या सर्वनाशापासून आधुनिक जग आपले संरक्षण करू शकेल.

× × ×

अशा स्वरूपाचे विचार विदर्भ साहित्य संघाच्या व्यासपीठावर गंभीरपणे चर्चिले जाऊ लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. दि. १५ नोव्हेंबर रोजी वि. सा. संघाच्या शाखाधिकाऱ्यांचे जे एक संमेलन अकोल्यास भरले होते त्यात विदर्भापुरते असे एक सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्याचे कार्य हेच यापुढे वि. सा. संघाचे प्रमुख कार्य मानून त्या दृष्टीनेच संघाच्या शाखांचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोचविण्याची योजना तयार करण्याचा निर्णय अकोल्याच्या संमेलनाने अनौपचारिक रीत्या घेतला. या निर्णयावर सर्व विचारवंतांनी गंभीरपणे विचार करून विधायक सूचना कराव्या, अशी आमची आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.

—पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

क वि ता

ज्ञानदेवाची समाधि

पु. य. देशपांडे

यौवनाच्या सरोभरी
वय वर्षे एकवीस
ज्ञानदेव घे समाधि
सारे विश्व हो उदास ॥१॥

यौवनाच्या सीमेवर
झाला प्रतिभा-ईश्वर
योगविश्व दणाणले
ब्रह्मदेवा पडे घोर ॥२॥

☆

'याला आवरा, आवरा
विश्व कापे थरथरा
ब्रह्मशक्तीचा उन्माद
विमुक्तीचा सुटे वारा ॥३॥

प्राकृतिक प्रलयाला
उरे कल्पकल्प काळ
विश्वात हा माजवील
आताच नित्य प्रलय ॥४॥

कर्मचक्र-कालावधि
आणील हा संपुष्टात
अलेख ते विधात्याचे
विरतील वैराणात ॥५॥

मानवा-मानवांतरी
चेतवील ब्रह्मज्योत
प्रकृति मायानगरी
होईल तीं अस्तंगत ॥६॥

सारी ही विश्वव्यवस्था
नेईलच हा लयाला
विश्वचक्र नेमीक्रम
जाईल रसातळाला ॥७॥

अवतार अर्थशून्य
याला आवर घालाया
नव्हे ही आसुरी शक्ति
ब्रह्मशक्तिच चिन्मया ॥८॥

शब्दकळेचा हा ईश
याचे औदार्य अपार
शब्दाशब्दातुनी देतो
सर्वा अमृत-तुषार ॥९॥

मर्त्य होतील अमर
सृष्टि-रचना नासेल
आवरा, आवरा याला
ब्रह्मदेवाचा हा बोल' ॥१०॥

☆

ब्रह्मदेव विष्णूकडे
गेला सोडण्या साकडे
विष्णु झाला हतबुद्ध
त्याला सुटेना हे कोडे ॥११॥

विष्णु गेला समाधीत
योगमायेच्या गर्भात
दिसले निवृत्तिनाथ
त्यांच्या पुढे जोडी हात ॥१२॥

★

' हे ईश्वराच्या ईश्वरा
योगेश्वरा, गुरुनाथा
आवर ही शिष्यमाया
दूर सार माझी व्यथा ॥१३॥

ब्रह्मदेव तुझा पुत्र
तुझ्या आदेशाचा दास
त्याची सृष्टि हादरली
ज्ञानेशाचा हा उल्हास ॥१४॥

ज्ञानदेव तुझा शिष्य
तुझीच प्रातिभज्योत
योगेशा, घ्या ही ओढूनी
आपल्याच अंतरात ॥१५॥

ना तरी महाप्रलय
होईल आता अटळ
सर्गस्थित्यंत–क्रमहि
खंडेल तो सर्वकाळ ॥१६॥

आसुरी शक्ति लीलया
आवरण्याचे मला बळ
ब्रह्मस्फूर्त प्रतिभेला
सावरण्या मी निर्बळ ' ॥१७॥

★

विष्णूवर दया केली
योगमायेच्या नाथाने
ज्ञानदेव अंतरला
समाधि घेतली त्याने ॥१८॥

निवृत्तिनाथ योगेश
शिष्यश्रेष्ठ तो ज्ञानेश
ब्रह्मांडाची शिवशक्ति
शेषशायीचेहि ईश ॥१९॥

★

ज्ञानदेवाची समाधि
गूढ हे नित्यनूतन
प्रातिभ चिद्विलासाचें
अव्यय स्फूर्तिनिधान ॥२०॥

' प्रातिभाद्वा सर्वम् '-सूत्र
ज्ञानेशाने केले सार्थ
शब्दकळेच्या रसिका
येथेच तुझा सर्वार्थ ॥२१॥

★ ★

माझ्या कवितेने सारे--

मा. गो. जामदार

' My Song has put off her adornments ' Rabindranath Tagore.

माझ्या कवितेने सारे
टाकलेत अलंकार
तुझ्यापुढे नटण्याचा
नाही तिला अहंकार
तुझ्या माझ्या मीलनाच्या
आड येती अलंकार
स्तोत्र झाकून टाकती
त्यांचे मंजुळ झंकार

माझ्या कवित्वाचा डौल
तुझ्यापुढे ओशाळतो
अगा ! महाकवे ! तुझ्या
चरणाशी मी लोळतो
साधी सरळ बासरी
तसे होऊ दे जीवन
गीतस्वरांनी मग हे
टाकशील तू भरून !

★ ★

अनुक्रमणिका

जिणे

शं. श्री. वाशीकर

आईच्या अंकावर बसुनी
राजा होण्या धजलो नाही
बाबापुढती घोटाळुन मी
अपार हर्षित झालो नाही. १

बालकपोलीचा अमृतरस
पापा घेउन प्यालो नाही
गोष्टीवेल्हाळांना घेउन
रम्य जगीं मी रमलो नाही २

' कदम कदम 'च्या युवकपदाशी
ताल कधी मी धरला नाही;
भार जगाचा वाकुन पेलित
त्यांची काठी झालो नाही ३

प्रियतमेच्या शब्दशिडांना
उभारिले नौकेवर नाही
प्रेमाच्या आगळ्या जगाचा
शोध कधी मी केला नाही ४

श्वासामध्ये श्वास मिळवुनी
शेजाऱ्यासह श्रमलो नाही
निढळावरचे घर्मबिन्दु मी
कधी कुणाच्या टिपले नाही ५

समानधर्मा सवे घेउनी
हासत खेळत लढलो नाही
अनेक वर्षे जगूनहि मी
क्षणभरसुद्धा जगलो नाही ! ६

★ ★

तुझी लागता चाहूल

राजामुकुंद

तुझी लागता चाहूल
लखलखली डहाळी
विरघळल्या दिठीची
आली फुलून पाकळी

आली फुलून पाकळी
तंग अनंग गीठाची
अयांगता पहाटली
माझ्या ' इवल्या ' पणाची

★ ★

अरे वादळा, मत्त तुफाना

विमलाबाई देशपांडे

अरे वादळा मत्त तुफाना
तुझे नि माझे जडते नाते
प्रचंड तांडव तुझे जेधवा
समूळ जीवन उलथुनि देते ।।

घराघरातील जीवन यांत्रिक
क्षणार्धात खळबळुनि टाकिसी
धरणीवर खिळलेले डोळे
खेचुनि भिडविसि आकाशासी ।।

क्षुद्र, बद्ध जे कुंठित ते ते
अनिर्वंध उत्तुंग स्पर्शिते
त्याच क्षणार्धी मत्त तुफाना
तुझें नि माझे जडते नाते ।।

★ ★

मराठी कथेतील मनोविश्लेषण

म. ना. लोही

आधुनिक मराठी ललितवाङ्मयाचा उद्गम आणि विकास हा बव्हंशी पाश्चात्य वाङ्मयाच्या परिचयातून व परिशीलनांतून झाला आहे. त्यामुळे तिकडे उदयाला आलेल्या व साहित्यावर प्रभाव पाडणाऱ्या अन्यान्य विचारप्रणाल्या इकडे पर्यायानेच अवतीर्ण झाल्या. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभीं समाज आणि व्यक्ति यांचा परस्पर संबंध विशद करणाऱ्या साम्यवादी व मनोविश्लेषणवादी विचारसरण्या युरोपांत जन्माला आल्या. त्यांचा प्रभाव कांहीसा उशीराच पण मराठी साहित्यावर प्रकर्षाने पडला. पहिल्या महायुद्धानंतर एक तपाचा काळ तेवढासा क्रांतिकारी ठरला नाही. त्यानंतर मात्र समाजसत्तावादाने साहित्यिकांना भारावून टाकलें. मनोविश्लेषणवादाचा परिणाम मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर झाला.

तीन अवस्था

कथावाङ्मयापुरताच विचार करावयाचा झाला तर विसाव्या शतकांतील कथेच्या तीन अवस्था स्पष्ट दिसून येतात. प्रथमावस्थेत तिचे स्वरूप सामाजिक असून ब्रीद समाजसुधारणेचे होते. तिच्यात व्यक्तीला फारसे महत्त्वाचे स्थान नव्हते. घटनांना महत्त्व होते. दुसऱ्या अवस्थेतील कथा ही देखील सामाजिक स्वरूपाचीच होती. पण तिच्यात संघर्षाला महत्त्व प्राप्त झाले होते. तिसऱ्या अवस्थेत मात्र महत्त्व व्यक्तीला आले. व्यक्तीचे बाह्य जीवन मागे पडून अंतर्जीवन हेच कथाविषय बनले.

गेल्या दोन दशकातील कथेचा विचार तेवढा येथे अभिप्रेत आहे. मनोविश्लेषणात्मक कथेचा उदय आणि विकास याच कालात झाला. याला पाश्चात्य कथावाङ्मय कितपत जबाबदार आहे? तिच्यातील प्रवृत्ति आणि प्रवाह कथेच्या विकासाला कितपत पोषक ठरले? मनोविश्लेषणामुळे कथेची प्रगति झाली की परागति झाली? यासारख्या बऱ्याच प्रश्नांचा उहापोह करावा लागेल. मराठी वाङ्मयाचा लेखकनिष्ठ विचार जवळ जवळ असंभव आहे. कारण मराठीत आत्मचरित्रें व दैनंदिन्या यांचा संपूर्ण अभाव आढळतो. त्यामुळे साहित्यांतर्गत पात्रांच्या अनुषंगानेच मनोविश्लेषणाचा विचार करू या.

प्रा. ना. सी. फडके यांचा प्रतिभा–साधन हा ललितवाङ्मयाच्या स्वरूपावर व अंतरंगावर प्रकाश टाकणारा मराठीतील पहिलाच प्रभावी ग्रंथ होय. यात

संघर्षाचा विचार करताना प्रा. फडके यांनी 'एकाच व्यक्तीच्या मनाची द्विधा स्थिति होऊन हे करू की ते करू असा झगडा तिच्या मनांत चालावा' हा एक प्रकार वर्णन केला आहे. श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनीहि एका लेखात 'कलेचे सारे वैशिष्टच, सौंदर्य आणि सामर्थ्य हे तिच्यात प्रतिबिंबित होणाऱ्या मानवी मनोव्यापारांच्या विविधतेवर, गाढतेवर आणि उत्कटतेवर अवलंबून असते' असे प्रतिपादन केले आहे. तरीहि फडके, खांडेकर किंवा माडखोलकर या तिन्ही सिद्धहस्त कथाकारांच्या कथावाङ्मयात मनोविश्लेषणाला फारसे महत्त्वाचे स्थान मिळालेले आढळत नाही. याला कारण तत्कालीन लेखकांना आकृष्ट करणारा समाजसत्तावाद हेच असावे.

मराठींत मनोविश्लेषणात्मक कथेचा प्रारंभ करणारे आघाडीचे लेखक म्हणजे श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. वामनराव चोरघडे आणि कृष्णाबाई हेच होत. रूढ सामाजिक नीतीला धक्का देऊन आपल्या मनाचे समाधान करून घेणाऱ्या युवकयुवतींचे चित्रण त्यांनी आपल्या कथातून केले. अप्रगट मनाचा प्रभाव व्यक्तीच्या वर्तनावर कसा पडतो यासंबंधी फ्राइडने जे संशोधन केले त्याच्या आधारे या लेखकांनी कथा लिहिल्या. मानसिक संघर्ष हाच या कथात प्रमुख आहे. त्यातून थोडी मानसिक विकृतीहि आहे. थोडी व्यभिचारी स्वैरता आहे. ही विविधता आणि विचित्रता हेच मानवी मनाचे व स्वभावाचे वैशिष्टच होय. नवरा असून दिरावर प्रेम करणे (नलिनीचे अश्रु), विवाहित स्त्रीवर प्रेम करणे (कृष्णकमळीची वेल), एकाने दोघींवर व दोघांनी एकीवर प्रेम करणे हे काहीसे लोकविलक्षण प्रकार पाध्यांच्या कथातून आढळतात. त्यात या अनैतिक वर्तणुकीचे व विचारांचे समर्थन नाही. विश्लेषण व चित्रण तेवढे आहे. सहजप्रवृत्ति व इच्छाशक्ति यांचा संघर्ष यात फारच प्रभावी आहे. पुरुष सहवासाची ओढ शमविण्यासाठी मित्राशी स्नेहाळ विश्रब्धतेने वागू पाहणारी स्त्री (घार) किंवा पत्नीच्या मैत्रिणीवर गेलेले मन मागे खेचण्याच्या प्रयत्नात मनोबल हरपून बसलेला पति यांचे चोरघड्यांनी केलेले चित्रण अंतर्विश्वांत अवगाहन करण्याची ओढच दाखविते. स्थूलाकडून सूक्ष्माकडे मराठी कथा वळत चालल्याची ती चिन्हे दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच दिसूं लागली होती. तथापि तिला खरे वळण मिळाले ते १९४४ सालानंतरच. या काळांत गोखले व गाडगीळ हे दोन नवीन पण समर्थ कथाकार उदयाला आले. त्यांनी केवळ नैतिक प्रश्नांचा विचार न करतां माणसाच्या अंतर्मनाचा ठाव घेण्याचा चंग बांधला. व्यक्तित्वाची चिरफाड, संज्ञाप्रवाहाचा पाठलाग आणि मानसिक विकृतीचे विश्लेषण त्यांनी कथेतून केले.

गाडगीळ व गोखले

सुरुवातीला गाडगीळांनी बालजगताचे चित्रण केले. किशोरावस्थेतून युवावस्थेत पदार्पण करणाऱ्या या तरुणाने अभ्यास, अनुभव आणि अनुमान यांच्या

सहाय्याने जी बालजगताची अद्‌भुत व अपूर्व अशी छटा दाखविली तिने तत्कालीन लेखक थक्क झाले. ॲडलरच्या प्रभुत्वाकांक्षाप्रधान बालमानसशास्त्राचा वापर करून त्यांनी 'मानसचित्रें' निर्मिली. बालकांच्या मनातील प्रभुत्वाची भावना मोठ्या मंडळीकडून पदोपदी दडपली जाते व त्यामुळे बालकात हीनगंड निर्माण होतो हा बहुतेक कथांचा विषय आहे. (मोहन, मीलन, नवे जग, रिकामी बस इत्यादि) लौकरच हे क्षेत्र इतरांवर (श्री. म. त्र्यं देव) सोपवून त्यांनी प्रौढांच्या अंतर्विश्वाकडे धाव घेतली. मध्यमवर्गाचे जीवन हे कसे दुःखद, कंटाळवाणे, विसंगत व विकृत आहे, हे दाखविण्यावरच त्यांचा अधिक भर आहे. व्यक्तीच्या अंतर्विश्वांतील अबोध, अज्ञेय व अतार्किक असा भाग दाखविण्यावर ते भर देतात. माणसाच्या मनातील निरनिराळे प्रवाह —सुष्ट–दुष्ट, मलीन–निर्मळ, सबल–दुर्बल—अगदी वास्तवतेने व तन्मयतेने चित्रित करण्यात त्यांचा हातखंडा आहे. 'कडू आणि गोड' 'नव्या वाटा' आणि 'कबुतरे' हे त्यांचे संग्रह एका पाठीमागून एक प्रसिद्ध झाले. या सर्वच संग्रहातून त्यांच्या बालसृष्टीचे दर्शन घडते. तथापि अधून मधून त्यांनी जे युवासृष्टीचे दर्शन घडविले त्यात वास्तवता, विविधता आणि वैचित्र्य नाही असे म्हणवत नाही. अर्थात अंतर्विश्वाचे चित्रण करणे किती कठीण आहे व ते यथार्थ घडविण्यास आपण असमर्थ आहोत याची जाणीव त्यांना आहे. 'छे, छे, त्या अंतर्विश्वाच्या मर्यादा, त्यातील गोष्टी आणि त्यांची संगति ह्याविषयी काहीच बोध होणे शक्य नव्हते. जाणिवेची इवलीशी पणती घेऊन त्या अंतर्विश्वांत खुडबुडणारी स्वतःची केविलवाणी मूर्ति पाहून त्याला हसू आले' तरीहि ते मोठ्या कुतूहलाने त्या अंतर्विश्वांत शिरतात. मनोव्यापारांची नोंद करू पाहतात.

गोखले सुरुवातीपासूनच माणसाच्या व्यक्तित्वाचे भिन्न थर उकलून दाखविण्यात रंगले आहेत. मनोव्यापारांतील व्यस्त, विपर्यस्त आणि द्वंद्वात्मक अनवस्थेशीं ते एकरूप झाले आहेत. (दोघं, नर, दिव्य इ.) तथापि त्यांना जीवनाविषयी आवड आहे. आत्मीयता आणि आस्था आहे. त्यांना सामाजिक जीवनाची जाणीव आहे. मनोविश्लेषणवाद हा केवळ व्यक्तिमनाचाच विचार करीत असला तरी व्यक्ति ही समाजापासून अलिप्त राहू शकत नाही, ही जाणीव गाडगीळापेक्षा गोखल्यांना अधिक दिसून येते. (मीलन, मंजुळा, सरहद्द इत्यादि) गोखल्यांची पात्रे अधिक आत्मशोधन करतात. म्हणूनच त्यांच्या हातून अविचार किंवा व्यभिचार घडत नाही. सुखात व दुःखात, मीलनात व विरहात ती थंडपणें विश्लेषण करीत राहतात. त्यांच्या मनात सहसा संघर्ष निर्माण होत नाही. (कामचक्र, अधर्म, मीलन इत्यादि) त्यांची पात्रे मोहाच्या पूर्ण आधीन होत

नाहीत. किंबहुना, 'एरुशा' किंवा 'अस्मत' यासारख्या वेश्यातून देखील एक प्रकारची सद्भावना, सत्प्रवृत्ति आणि सभ्यता आढळते.

भावे आणि इतर

गेल्या दोन दशकात आघाडीवर आलेले मुख्य मनोविश्लेषणवादी कलाकार म्हणजे श्री. पु. भा भावे. 'प्रौढ स्त्रीपुरुषांच्या लैंगिक आकर्षणाचे चित्रण करणारे कथाकार' म्हणून ते महाराष्ट्राला परिचित आहेत. 'वर्षाव' आणि 'अंतराळ' या कादंबऱ्यातूनहि त्यांनी मनोविश्लेषणावर भर दिला आहे. त्यांच्या कथातून आढळणारा रंगेलपणा व रग्गेलपणा हा त्यांच्या प्रकृतीचा द्योतक आहे. मध्यम वर्गीयात आढळणाऱ्या विकृत मनोवृत्तीचा शोध करून बोध करून द्यावा म्हणून ते अंतरंगात शिरले आणि या मानसमंथनातून त्यांच्या काही उत्कृष्ट कथा जन्माला आल्या. (सीमेवर, सतरावे वर्ष, व्यथा, संगम इत्यादि.)

याशिवाय अच्युत बर्वे, शांताराम, सदानंद रेगे, जी. ए. कुलकर्णी, म. त्र्यं. देव इत्यादि अनेक कथाकारांनी मनोविश्लेषणाचा सफल वापर आपल्या कथातून केला आहे. याला दोन कारणे असू शकतात. पाश्चात्य कथावाङ्मयाचे परिशीलन हे एक आणि आघाडीवरील लोकप्रिय लेखकांचे अनुकरण व अनुसरण हे दुसरे. 'सत्यकथा' आणि 'अभिरुचि' हीं मासिकें नवीन प्रयोगांना प्रोत्साहन देत होती. शिवाय लोकांच्या दृष्टिकोनातहि बदल घडू पहात होता. कदाचित पाश्चात्य वाचक व लेखकाबद्दल डॉ. जोड (C. E. M. Joad) यांनी आपल्या A Guide to Modern Thought या ग्रंथात जे मत व्यक्त केले आहे तेच अलिकडील महाराष्ट्रीय वाचकांनाहि लागू पडत असेल. सामान्य वाचकाला अंतर्जीवनाबद्दलची ओढ लागली आहे आणि आजचा लेखक मानसशास्त्रीय प्रयोगात दंग आहे, असे विचार डॉ. जोड यांनी व्यक्त केले आहेत.

मराठी कथावाङ्मयांत जे मनोविश्लेषण आले ते पाश्चात्य कथेच्या अनुषंगाने आले ही गोष्ट खरी असली तरी एक शंका कायमच राहते. ती अशी की, लॉरेन्स, जॉईस किंवा पोर्टर या लेखक-लेखिका द्वितीय युद्धपूर्व आघाडीवरील लेखकांना अपरिचित नव्हत्या; मग त्यांनी मनोविश्लेषणात्मक कथा का लिहिली नाही? उलट ज्या वयात गोखले–गाडगीळांनी मनोविश्लेषणात्मक कथा लिहिली तेव्हा त्यांनी पाश्चात्य वाङ्मयाचे कितपत परिशीलन केले असेल हे शंकास्पद आहे. कारण एकतर दोघेहि मानसशास्त्राचे किंवा साहित्याचे विद्यार्थी नव्हते. शिवाय दोघेहि विद्यार्थिदशेतच होते. उलट फडके हे मानसशास्त्राचे प्राध्यापक तर खांडेकर पाश्चात्य साहित्याचे शौकीन असल्यामुळे नामवंत पाश्चात्य लेखक-लेखिकांशी त्यांचा परिचय अधिक अपेक्षित आहे. त्यामुळे नवकथेत अवतरलेले मनोविश्लेषण तत्त्व केवळ पाश्चात्य वाङ्मयाच्या अनुकरणातून किंवा परिशीलना-

अनुक्रमणिका

तून आलें आहे असे एकदम म्हणवत नाही. तरी याबद्दल स्वतः या लेखकांनीच खुलासा केल्यास अभ्यासकांना मदत होईल.

मनोविश्लेषणाची फलश्रुति

मनोविश्लेषणात्मक कथेतील प्रवृत्ति व प्रवाह कथेच्या विकासाला कितपत पोषक ठरले ? या प्रश्नाचा थोडा विचार करू. असंस्कृत व विकृत मनाचा विचार करण्याची मानसशास्त्रीय नवकथेची प्रवृत्ति आहे. गाडगीळ बालकांच्या मनाचा आविष्कार करीत. त्यांनी निर्माण केलेल्या कितीतरी कथा अमूल्य व अविस्मरणीय आहेत. बालकातील प्रभुत्वाकांक्षा व मनोगंड यांचा त्यांनी केलेला आविष्कार अपूर्व असून त्यामुळे मराठी कथेचे एक दालन निश्चितच समृद्ध झाले आहे. विकृत मनांचा त्यांनी केलेला आविष्कार देखील असाच असून त्यात नाविन्याबरोबरच वास्तवता आहे. 'किडलेली माणसे' किंवा 'मृत्यूचे संजीवन' यासारख्या कथातून अगदी मोजक्या वाक्यात ठसठशीत विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तिरेखा वाचकापुढे मांडल्या. गोखल्यांनी व्यक्तित्वाचे विश्लेषण करणाऱ्या कथा लिहून मराठी कथेच्या कक्षा कितीतरी विस्तृत केल्या. 'दोघं', 'नर' किंवा 'दिव्य' अशा कथा वेगळ्या धाटणीच्या व अपूर्व अशाच नाहीत का ?

नवकथेत प्रामुख्याने दोन प्रवाह आढळतात. एक प्रवाह मानवाबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या लेखकांचा आणि दुसरा जीवनाबद्दल उबग बाळगणाऱ्या लेखकांचा. जीवनाकडे दोन दृष्टिकोनातून पाहिल्या गेल्यामुळे दोन्ही प्रवाहांचा मागोवा घेत वास्तवाची जाणीव सुलभ होऊ शकते. हा एक मनोविश्लेषणवादी नवकथेमुळे फायदा झाला आहे. तात्पर्य, मनोविश्लेषणाने कथेच्या कक्षा वाढवून कथेच्या प्रगतीला हातभारच लावला आहे.

मनोविश्लेषणामुळे कथेची परागती झाली काय ? मुळीच नाही. कक्षांचा विस्तार ही प्रगति की परागति ? मनोविश्लेषणामुळे व्यक्तिदर्शन अधिक वास्तव व परिपूर्ण होऊ लागलें. कोणतीहि व्यक्ति कोणत्याहि एका साचात बसू शकत नाही हे मनोविश्लेषणाने सांगितल्यामुळे नवकथेतील व्यक्तिदर्शन अचूक बनले. त्यात विविधतेबरोबरच वास्तवता व परिणामकारिता आली. मनोविश्लेषणाने माणसाचे व्यक्तित्व, कर्तृत्व आणि विचार याकडे पाहण्याची नवीन दृष्टि लाभली, हा सर्वच ललित साहित्याला फायदा झाला. तसाच तो कथेलाहि झाला. व्यक्तिदर्शन हा तर कथेचा प्राणच होय. अर्थातच व्यक्तिदर्शनाच्या नवीन पद्धतीमुळे कथेची निश्चितच प्रगति झाली आहे. व्यक्तित्व विश्लेषण, संज्ञाप्रवाहाचे आकलन आणि रूढ नीतीचे निर्मूलन यामुळे कथेची परागति झाली असे कोण म्हणेल ?

एकूण, मनोविश्लेषणामुळे कथेला एक प्रकारची खोली (Depth) आणि सघनता (Solidity) प्राप्त झाली आहे. दोन दशकापूर्वी म्हणजे नवकथेच्या

जन्मापूर्वी कथेला लांबी रुंदी होती पण खोली नव्हती. मनोविश्लेषणामुळे ही खोली प्राप्त झाली आहे. कारण आता कथा बाह्यविश्वाचे कवच फोडून अंतर्विश्वात भ्रमण करू लागली आहे. गोखल्यांच्या दोघं, नर किंवा कामचक्र, अधर्म या कथा, गाडगीळांच्या किडलेली माणसे, मृत्यूचे संजीवन किंवा चुंबन, स्वप्नरंजन या कथा न्याहळून पाहिल्यास या विधानाचा प्रत्यय येईल. तीच गोष्ट सघनतेची. मानसशास्त्रज्ञांच्या मते प्रत्येक अनुभव हा मिश्र स्वरूपाचा असतो. प्रत्येकाचा स्वभाव हा विक्षिप्त असतो. या स्वभावाचा व अनुभवाचा आविष्कार घडवताना मनोविश्लेषणात्मक कथा प्रयत्नपूर्वक ही संमिश्रता, विविधता आणि वैशिष्टय अचूकपणे मांडण्यासाठी धडपडते. जीवनाशय व जीवनानुभव अधिक साकल्याने व्यक्त झाल्यामुळे नवकथा अधिक सघन वाटते.

कथेतील मनोविश्लेषणात अनुभवापेक्षा अनुमानाचा भाग अधिक असल्यास नवल नाही. शिवाय लेखकाला जी अलिप्तता आवश्यक असते, तीमुळे मूळ अनुभवाला अनुमानाची जोड देऊन एक नवीन सृष्टि निर्माण करावी लागते. लेखकनिष्ठ विचार अशक्य का आहे ते आधी सांगितले आहेच. मनोविश्लेषण तत्त्व लेखकाला लागू करण्यात अडचण पडते. स्वतःचें अप्रगट मन स्वतःलाच अज्ञात असल्यामुळे लेखकाची प्रेरकशक्ति कोणती हे सांगणे कठीण असते. मनोविश्लेषणांत आत्मपरीक्षणाचा (Introspection) कितपत उपयोग होईल हा प्रश्नच आहे. आणि परनिरीक्षणांत (Retrospection) अनुमानाचा उपयोग अधिक म्हणून लेखकाने अनुमानाचा उपयोग केल्याबद्दल दोष देणे अनुचित ठरते.

माणसाच्या आंतरिक जीवनाचा शोध करून बोध करून देणे कठीण असल्याचा निर्वाळा पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांनी दिलेला आहे. नवकथेने तसा प्रयत्न केला आहे. आणि मनोविश्लेषणाखेरीज व्यक्तिदर्शन असंभव असल्याची जाणीव वाचक व लेखकांना आलेली आहे. पूर्वीचे लेखक मनोविश्लेषणाचा साधन म्हणून उपयोग करीत. कथेला परिणामकारिता यावी या उद्देशाने मनोविश्लेषणाचा ठिगळवजा उपयोग केला जात असे. अलिकडच्या लेखकांचे साध्यच मुळी मनोविश्लेषण हे आहे. कारण त्यांना जीवनदर्शन घडवायचे आहे. मनोदर्शन हेच खरे जीवनदर्शन. मनोदर्शन म्हणजेच मनोविश्लेषण. म्हणून नवलेखकांचे साध्य तेच आहे. त्यामुळे मनोविश्लेषण हे कथेचे अंग राहिले नाही. मनोविश्लेषण हाच कथेचा आत्मा बनला आहे. साध्य बदलल्यामुळे पर्यायाने स्वरूपहि बदलले.

याप्रमाणे मराठी कथेचा ओघ नवीन दिशेला वळविण्याचे कार्य मनोविश्लेषणाने केलें. तिच्या कक्षांचा विस्तार केला. तिला खोली प्राप्त करून दिली. तिचे स्वरूप पालटले. गेल्या दोन दशकात ही उत्क्रांति घडून आली.

卐

भीष्म विवाहित होते काय ?

म. म. डॉ. वा. वि. मिराशी

पंडित सीतारामशास्त्री कुरुंदकर यांनी 'युगवाणी'च्या दीपावलि विशेषांकात 'भीष्म विवाहित की अविवाहित' या शीर्षकाचा एक अत्यंत विचारोद्‌बोधक लेख लिहिला आहे. महाभारतात भीष्म पितामहाची व्यक्तिरेखा अनन्यसाधारण आहे. शौर्य, चारित्र्य, विद्वत्ता इत्यादि गुणामुळे ते इतर पात्रामध्ये विशेष उठून दिसतात. अशा महापुरुषाबद्दल फार प्राचीन काळापासून सर्वांस अत्यंत आदर वाटत आला आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनी ज्यांच्याबद्दल

> 'तस्मिन्नस्तमिते भीष्मे कौरवाणां धुरन्धरे ।
> ज्ञानान्यस्तं गमिष्यन्ति ············ ।।'

असे म्हटले त्यांच्या थोरवीचे काय वर्णन करावे ?

भीष्मप्रतिज्ञेचा अर्थ

भीष्म पितामहांच्या चरित्रातील ज्या एका घटनेबद्दल सर्वांना अत्यंत आदर वाटत आला आहे ती घटना म्हणजे त्यांनी आपल्या पित्याच्या सुखाकरिता केलेली ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा ही होय. या प्रतिज्ञेचा उल्लेख महाभारतातच अनेक ठिकाणी आला आहे. उदाहरणार्थ, भारतीय युद्धांत भीष्म धारातीर्थी पडले हे संजयाकडून ऐकल्यावर धृतराष्ट्र विचारतो—

> कथमाचक्ष्व मे योधा हीना भीष्मेण पांडव ।
> बलिना देवकल्पेन गुर्वर्थे ब्रह्मचारिणा ।।
>
> (भीष्मपर्व, अ. १४, श्लो. २)

या श्लोकांत भीष्मांनी पित्याकरिता ब्रह्मचर्याचे आमरण आचरण केल्याचा उल्लेख आहे. यासारखाच श्लोक पुनः (भीष्मपर्व, अ. १२०, श्लो. १) आला आहे. त्यावरून या भीष्मप्रतिज्ञेची भीषणता आणि तिच्याविषयी लोकांना वाटत असलेला आदर व्यक्त होत आहे. पण या प्रतिज्ञेचे नक्की स्वरूप काय होते, याविषयी प्राचीन काळापासून मतभेद आहे. सध्या सामान्यत: भीष्मांनी सत्यवतीचा पिता दाश (धीवर) याच्या खात्रीकरिता आपण विवाहच करणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती अशी समजूत आहे. उदाहरणार्थ, कै. चिं. वि. वैद्य आपल्या The Mahabharata : A Criticism या ग्रंथात म्हणतात—

Shantanu would not disinherit Bhishma, who, however, of his own accord, relieved his father from difficulty and not only renounced his right to the heirship but resolved not to marry at all so that there might be no progeny from him to quarrel with Satyavati and the sons that might be born to her." (पृ. ९३). यामध्ये आपण मुळी विवाहच करणार नाही अशी प्रतिज्ञा भीष्मांनी केली असे कै. वैद्यांनी म्हटले आहे. वैद्यांचा महाभारताचा अभ्यास दीर्घकालीन आणि गाढ होता. त्यांनी महाभारतावर इंग्रजी व मराठीमध्ये अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा 'महाभारताचा उपसंहार' हा ग्रंथ त्यांच्या महाभारताच्या सूक्ष्म चिकित्सक अध्ययनाची साक्ष देतो. या अभ्यासामुळे त्यांना 'भारताचार्य' अशी सार्थ पदवी मिळाली होती. अशा विद्वान् व चिकित्सक अभ्यासकाचे मत भीष्मांनी विवाहच केला नाही असे होते. याच्या उलट पं. सीतारामशास्त्रींनी भीष्म अगोदरच विवाहित झाले होते आणि त्यांच्या प्रतिज्ञेचा अर्थ 'मी यापुढे स्त्रीसंग करणार नाही' असा होता असे प्रतिपादिले आहे. त्यांनी त्या मताची कारणेहि दिली आहेत. त्यांचा पुढे विचार करू. प्रथम हे सांगितले पाहिजे की हे मतहि नवीन नाही. कांही प्राचीन टीकाकारांनी भीष्मप्रतिज्ञेचा असाहि अर्थ केला आहे. उदाहरणार्थ, महाभारताचा टीकाकार नीलकंठ याने आपले मत पं. सीतारामशास्त्र्यांप्रमाणेच दिले आहे. तो उतारा पुढे देऊ. मराठी प्राचीन कवि मुक्तेश्वर याने 'आजिपासोनि निजनेमस्त । अक्षय ब्रह्मचर्य व्रत अंगिकारिले म्यां निश्चित । पितयालागीं सद्भावें ।। (आदिपर्व, अ. २३, श्लो. ७०) असे मुळास धरून भाषांतर केले आहे. ते या बाबतींत स्पष्ट नाही. पण मोरोपंतांनी मात्र भीष्मांनी स्त्रीसंग वर्ज्य करण्याची प्रतिज्ञा केली असे स्पष्टपणे म्हटले आहे--

गांगेय म्हणे 'त्यजिला स्त्रीसंग, सशंक दाशवर ज्यांत' ।
अनृत वदेन तरि गळो हें, न रणमखीं कदा, शव रजांत ।।
(आदिपर्व, अ. १३, आ. ९६)

भीष्मप्रतिज्ञेच्या अर्थाच्या बाबतीत असा मतभेद दिसत असल्यामुळे उपलब्ध प्रमाणांचा जरा बारकाईने विचार करणे जरूर आहे.

'भीष्म विवाहित होते' या मताची प्रमाणे

पं. सीतारामशास्त्री यांनी 'भीष्म विवाहित होते' हे दाखविणारी पुढील प्रमाणे दिली आहेत.

(१) भीष्मांनी नैष्ठिक ब्रह्मचर्य अंगिकारिले नव्हते. तेव्हा ब्रह्मचर्याश्रम संपवून पितृगृही आल्यानंतर शंतनु सत्यवतीच्या प्रेमपाशात सापडण्यापूर्वी भीष्मांचा विवाह झाला असलाच पाहिजे.

(२) गीता प्रेसने प्रकाशित केलेल्या महाभारताच्या प्रतीत

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया दिवि ॥

या सर्व प्रतींत आढळणाऱ्या प्रतिज्ञेनंतर खालील श्लोक आले आहेत.

न हि जन्मप्रभृत्युक्तं मम किञ्चिदिहानृतम् ।
यावत्प्राणा ध्रियन्ते वै मम देहसमाश्रिताः ॥
तावन्न जनयिष्यामि पित्रे कन्यां प्रयच्छ मे ।
परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ॥

असा मैथुनत्यागाचा अर्थात् स्त्रीसंगवर्जनाचा स्पष्ट उल्लेख आहे.

असाच उल्लेख पुढे एका प्रसंगाच्या वर्णनात आला आहे. विचित्रवीर्याच्या अकाली निधनानंतर सत्यवतीने भीष्मास 'त्याच्या दोन्ही स्त्रियांच्या ठिकाणी धर्मविहित नियोगपद्धतीने पुत्रोत्पत्ति करावी' असे सुचविताच भीष्मांनी उत्तर दिले—

असंशयं परो धर्मस्त्वया मातरुदाहृतः ।
राज्यार्थे नाभिषिञ्चेयं नोपेयां जातु मैथुनम् ।
त्वमपत्यं प्रति च मे प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ॥
(आदिपर्व, संभवपर्व, अ. १०३ श्लो. १३)

यातहि विवाहत्यागाचा उल्लेख नसून स्त्रीसंगत्यागाचाच आहे. त्यावरूनहि त्या प्रतिज्ञेच्या वेळी भीष्म विवाहित होते हेच सिद्ध होते.

(३) भीष्मांनी शंभर अश्वमेध केले होते (अश्वमेधशतैरिजे) असे श्रीकृष्णांनी म्हटले होते. श्रौत यज्ञ करण्यास पत्नीची जरूरी असते. अर्थात् भीष्मांनी यज्ञ केले त्या वेळी ते विवाहित असलेच पाहिजेत. हा एकच उल्लेख भीष्म विवाहित होते हे सिद्ध करण्यास पुरेसा आहे.

वरील प्रमाणांचे परीक्षण

आता आपण या प्रमाणांचे परीक्षण करू. (१) प्रथमच हे सांगितले पाहिजे की भीष्म विवाहित होते यासंबंधी स्पष्ट पुरावा महाभारतात आला नाही. आणि पं. सीतारामशास्त्रींनीहि हे कबूल केले आहे. गंगेने आपला पुत्र भीष्म याला शंतनुच्या स्वाधीन केल्यावर शंतनु राजा आपल्या राजधानीस आला आणि

त्याला त्याने यौवराज्याभिषेक केला. त्यानंतर चार वर्षे गेल्यावर दाशकन्या सत्यवती शंतनूच्या दृष्टीस पडली असे म्हटले आहे—

स तथा सह पुत्रेण रममाणो महीपतिः ।
वर्तयामास वर्षाणि चत्वार्यमितविक्रमः ।।
(आदिपर्व, १००, ४४–४५).

या चार वर्षांत काय काय घटना झाल्या याचें वर्णन महाभारतात नाही. भीष्म हा शंतनूचा एकुलता एक मुलगा. तो महर्षींकडून सांगोपांग वेद, विविध शास्त्रें व धनुर्वेद शिकला होता. अशा राजकुमाराचा विवाह या काळात झाला असता तर यौवराज्याप्रमाणे त्याचेहि वर्णन महाभारतांत आले पाहिजे होते. भीष्माने पुढे राज्यावरचा हक्क सोडला म्हणून त्याच्या यौवराज्याचा उल्लेख येणे जसे आवश्यक, त्याप्रमाणेच त्याने पुढे स्त्रीसंग वर्ज्य करण्याची प्रतिज्ञा केली असल्यास अगोदर त्याचा विवाह झाला होता हे सांगणे आवश्यक होते. पण त्याचा उल्लेख भारताच्या कोणत्याहि आवृत्तीत आला नाही. पुढे दाशासमोर केलेल्या प्रतिज्ञेत—

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया दिवि ।।

असा श्लोक महाभारताच्या सर्व प्रतीत आढळतो. पण त्यात केवळ ब्रह्मचर्याचा उल्लेख आहे. ब्रह्मचर्य हे विवाहित अवस्थेत स्त्रीसंग न करण्याने तसेच मुळी विवाहच न करण्यानेहि पाळता येईल. अद्यप्रभृति (आजपासून) या शब्दावरून त्या घटनेपूर्वी भीष्म विवाहित असल्यामुळे ब्रह्मचर्य पाळत नव्हते, पुढे मात्र स्त्रीसंग वर्ज्य करून त्यांनी ते पाळण्याची प्रतिज्ञा केली असे म्हणणे शक्य आहे. पण पूर्वी विवाह झाला नसताहि 'यापुढे माझे ब्रह्मचर्य राहील' असे म्हणणे अगदीच असंभवनीय वाटत नाही. तेव्हा वरील श्लोकावरून निर्णय होत नाही. पं. सीतारामशास्त्री यांनी यानंतर गीताप्रेसच्या आवृत्तींत आलेल्या खालील श्लोकाचा उल्लेख केला आहे तो मात्र या बाबतीत महत्त्वाचा आहे.

यावत्प्राणा ध्रियन्ते वै मम देहं समाश्रिताः ।
तावन्न जनयिष्यामि पित्रे कन्यां प्रयच्छ मे ।
परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ॥

या श्लोकात मैथुनत्यागाचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे पं. सीतारामशास्त्री म्हणतात तसा भीष्मप्रतिज्ञेचा अर्थ केला पाहिजे आणि भीष्म विवाहित होते हे मानले पाहिजे. पण हे श्लोक मूळच्या महाभारतात होते काय याचा संशय आहे. गेल्या दोन अडीच हजार वर्षांत महाभारताच्या स्वरूपात पुष्कळच फरक झाला

आहे. अनेक कवींनी व लेखकांनी आख्याने, वर्णने, तीर्थांच्या यात्रा व देवादिकांच्या स्तुति वगैरेंचे प्रक्षेप करून महाभारताचा पुष्कळच विस्तार केला आहे. म्हणून भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशातून महाभारताच्या पोथ्या जमवून आणि भारता-बाहेर गेलेल्या पोथ्यांच्या नकला आणवून त्या सर्वांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून महाभारताची शक्य तो जुनी प्रत निश्चित करण्याचा प्रयत्न पुण्याचे भांडारकर प्राच्य विद्यासंशोधन मंडळ गेली चाळीस वर्षे अविरतपणे करीत आहे. या दीर्घकालानंतर आता ते कार्य पूर्ण झाले आहे. महाभारताच्या या चिकित्सक आवृत्तीत सर्वांत शुद्ध ठरलेला पाठ देऊन तळटीपांत भिन्न भिन्न हस्तलिखितात आढळणारे विविध पाठ दिलेले असतात. त्यावरून कित्येकदा सबंध अध्यायच महाभारतांत घुसडलेले आढळतात. विवाद्य प्रश्नांचा योग्य तऱ्हेने निर्णय करावयाचा असेल तर या चिकित्सक आवृत्तीचे साहाय्य घेतले पाहिजे.

चिकित्सक आवृत्तीचा पुरावा

प्रस्तुत प्रकरणी या आवृत्तीचा पुरावा पाहिला असता तो निश्चितपणे या श्लोकांच्या विरुद्ध जातो. त्या आवृत्तीत भीष्माची प्रतिज्ञा खालील श्लोकात दिली आहे—

अद्यप्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षयाभुवि ॥

पण पं. सीतारामशास्त्रींनी गीताप्रेसच्या आवृत्तीतून उद्धृत केलेले 'न हि जन्मप्रभृत्युक्तं मम किञ्चिदिहानृतम् ।···परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ॥' हे श्लोक प्रक्षिप्त म्हणून भांडारकर मंडळाच्या आवृत्तीत तळटीपेत दिले आहेत. गीताप्रेसच्या आवृत्तीतहि (आदिपर्व, पृ. १३८–३९) हे श्लोक कंसात दिले आहेत. त्यावरून त्या आवृत्तीच्या संपादकास ते प्रक्षिप्त वाटले असावे. ग्रंथारंभीच्या निवेदनात ते म्हणतात—'दाक्षिणात्यपुस्तकेषूपलभ्यमानानामतिरिक्तश्लोकानामप्युपयोगिनो भागा ग्रन्थेऽस्मिन् यथास्थानं ( ) कोष्टकबद्धाः संनिवेशिताः ।' त्यावरून हे श्लोक उत्तर भारतीय पोथ्यात आढळत नाहीत हे उघड आहे. पुण्याच्या चित्रशाळेने छापलेल्या आवृत्तीतहि ते आढळत नाहीत.

त्याप्रमाणेच सत्यवतीने भीष्मास नियोगाकरिता सांगितले त्यावेळच्या भीष्माच्या उत्तराचे खालील श्लोक गीताप्रेसने दिले आहेतः—

असंशयं परो धर्मस्त्वया मातदाहृतः ।
राज्यार्थे नाभिषिञ्चेयं नोपेयां चापि मैथुनम् ॥
त्वमपत्यं प्रति च मे प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ॥

या श्लोकातील मधली पंक्ति भांडारकर मंडळाच्या आवृत्तीत तसेच चित्रशाळेच्या आवृत्तीतहि आढळत नाही. सध्याच्या ठिकाणी ती अयोग्यहि वाटते

ती पंक्ति घालावयाचीच झाली तर ती प्रतिज्ञेच्या उल्लेखानंतर आली पाहिजे होती. तेव्हा तीहि प्रक्षिप्त आहे यात संशय नाही.

महाभारतातील एतद्विषयक इतर उल्लेख

या दोन उल्लेखाखेरीज स्त्रीसंगपरिहाराचा निर्देश महाभारतात आढळत नाही. काही ठिकाणी भीष्मांना त्याच्या दूषकांनी 'तृतीया प्रकृति' किंवा 'क्लीब' म्हटले आहे खरे, पण त्याचे कारण त्यानी स्त्रीसंग वर्ज्य केला हे जसे संभवते, तसेच त्यानी विवाह केला नाही किंवा नियोगाला संमति दिली नाही हेहि संभवते. सभापर्वात (अध्याय ४१) श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान द्यावा या भीष्मांच्या सूचनेमुळे चिडून गेलेला शिशुपाल म्हणतो—

युक्तमेतत्तृतीयायां प्रकृतौ वर्तता त्वया।
वक्तुं धर्मादपेतार्थं त्वं हि सर्वकुरूत्तमः॥

(षंढ असलेल्या त्वां श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान द्यावा असे अधर्म्य भाषण करणे योग्यच आहे. कारण तशाच प्रकारच्या कौरवांचा तू नायक आहे.)

भीष्माच्या ब्रह्मचर्यप्रतिज्ञेचा अधिक्षेप करताना शिशुपाल त्यांनी नियोग-विधीने आपल्या भावजईच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ति करण्यास संमति दिली नाही याचा उल्लेख करतो—

दारयोर्यस्य चान्येन मिषतः प्राज्ञमानिना।
तव जातान्यपत्यानि सज्जनाचरिते पथि॥
को हि धर्मोस्ति ते भीष्म ब्रह्मचर्यमिदं वृथा।
यद्धारयसि मोहाद्वा क्लीबत्वाद्वा न संशयः॥

(सभापर्व, ४१, २४–२५)

तेव्हा यासारख्या उल्लेखावरून भीष्मांनी विवाह केला होता हे सिद्ध होत नाही.

भीष्मांचे अश्वमेध यज्ञ

यानंतर पं. सीताराम शास्त्रींनी दिलेले तिसरे प्रमाण भीष्मांनी शंभर अश्वमेध यज्ञ केले (अश्वमेधशतैरिजे।) हे होय. श्रौत यज्ञाकरिता पत्नीची जरूरी लागते. तेव्हा भीष्म विवाहित होते असे त्यांचे अनुमान आहे. या श्लोकाचा त्यांनी संदर्भ दिला नव्हता म्हणून मी त्यांना तो विचारला. तेव्हा त्यांनी प्रो. पी. पी. एस्. शास्त्री यांनी संपादिलेल्या महाभारताच्या भीष्मपर्वांतील, अध्याय २१, श्लोक १५ मधील श्रीकृष्णाच्या भाषणातील खालील उल्लेखाकडे माझे लक्ष वेधले—

स एष भीष्मः कुरुवंशकेतु–
येनाहुतास्त्रिशतं वाजिमेधाः॥

हा श्लोक गीताप्रेसच्या तसेच चित्रशाळाप्रेसच्याहि आवृत्तीत आहे. या श्लोकात भीष्मांनी तीनशे अश्वमेध केल्याचा उल्लेख आहे. भीष्मांनी एकहि अश्वमेध केला असता तरी त्यांनी विवाह केला होता असे मानणे प्राप्त आहे. म्हणून पं. सीतारामशास्त्रींनी या प्रमाणावर विशेष जोर दिला आहे. पण भीष्माने असे तीनशे अश्वमेध केले याला प्रमाण आहे काय ? भीष्म दीर्घायुषी होते. निधन-समयी त्यांचे वय १८६ वर्षांचे असावे असे अनुमान आहे (पं. सिद्धेश्वरशास्त्रीकृत प्राचीन चरित्र कोश, पृ. ४१३). ते खरे मानले तरी त्यांच्या हातून इतके अश्वमेध झाले असतील असे वाटत नाही. किंबहुना त्यांच्या एकाहि अश्वमेधाचा महाभारतात उल्लेख नाही. अश्वमेध यज्ञ करण्यापूर्वी यज्ञीय अश्व पृथ्वीवर यथेच्छ फिरण्याकरिता सोडावा लागतो आणि तो कोणी पकडल्यास त्याच्याबरोबर युद्ध करून त्याचा पाडाव करावा लागतो. नंतर अश्वमेध यज्ञ करण्याचा अधिकार राजाला प्राप्त होतो. युधिष्ठिराने भारतीय युद्धानंतर एक अश्वमेध केला. त्याचे वर्णन महाभारताच्या आश्वमेधिक पर्वांत आहे, पण भीष्माच्या तीनशे अश्वमेधापैकी एकाचाहि महाभारतात अन्यत्र उल्लेख नाही. तेव्हा या अश्वमेधाबद्दल संशय उत्पन्न होतो. भांडारकर मंडळाच्या आवृत्तीत—

'स एष भीष्मः कुरुवंशकेतु-
येनाहृतास्त्रिशतो वाजिमेधाः ।।'

असा पाठ दिला आहे. त्यातील 'त्रिशतो' हे पद आर्ष आहे. या पाठात भीष्माने तीस अश्वमेध केले होते असे म्हटले आहे. या पाठावरहि वरील आक्षेप लागू पडतो. या पाठासंबंधी भीष्मपर्वाचे संपादक डॉ. बेलवलकर म्हणतात, 'The fact of Bhishma having performed 30 (or 300) Ashvamedhas is not known from other parts of the epic.' [भीष्मांनी तीस (किंवा ३००) अश्वमेध यज्ञ केल्याबद्दल महाभारतांत इतरत्र उल्लेख नाही.] म्हणून त्यांनी 'येनार्दितास्त्रैशताः शौरिसंघाः' अशा दुसऱ्या पाठाकडे अंगुलिनिर्देश केला आहे. ऐतिहासिक काळांत समुद्रगुप्ताने एक, पुष्यमित्राने दोन आणि प्रवरसेनाने चार अश्वमेध केल्याचे उल्लेख आढळतात. जास्तीत जास्त अकरा अश्वमेध विष्णुकुंडीवंशी प्रथम माधववर्म्याने केल्याचा उल्लेख आहे. तेव्हा तीनशे किंवा तीसहि अश्वमेध भीष्मांनी खरोखर केले होते काय याबद्दल मोठा संदेह उत्पन्न होतो. तेव्हा हे प्रमाणहि निर्णायक म्हणता येत नाही.

भीष्म अविवाहित होते याविषयी प्रमाण

पण मग यासंबंधी काही निर्णायक पुरावा महाभारतात सापडतो काय, असा प्रश्न उपस्थित होतो. या संबंधात आम्ही महाभारताच्या खालील श्लोकाकडे वाचकांचे लक्ष वेधतो.

आदिपर्वाच्या संभवपर्व नामक भागात (अ. १०३) सत्यवती भीष्मांना नियोगविधीने विचित्रवीर्याच्या दोन पत्नींच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ति करावयास सांगताना म्हणते--

इमे महिष्यौ भ्रातुस्ते काशिराजसुते शुभे ।
रूपयौवनसंपन्ने पुत्रकामे च भारत ।।९।।
तयोरुत्पादयापत्यं संतानाय कुलस्य नः ।
मन्नियोगान्महाभाग धर्मं कर्तुमिहार्हसि ।।१०।।
राज्ये चैवाभिषिच्यस्व भारताननुशाधि च ।
दारांश्च कुरु धर्मेण मा निमज्जीः पितामहान् ।।११।।

यातील पहिल्या दोन श्लोकात भीष्मांना नियोगाचा आग्रह करून नंतर सत्यवती त्यांना त्यांच्या पूर्वीच्या प्रतिज्ञेतून सोडवत आहे. ती म्हणते, 'माझ्या आज्ञेने याप्रमाणे नियोगविधि केल्यावर तू स्वतःस राज्याभिषेक करवावा आणि भारतदेशाचे राज्य करावे. **तसेच धर्माने विवाह करावा.** (ब्रह्मचारी राहून) पितरांचा अधःपात करू नको' 'दारांश्च कुरु धर्मेण' याचा सरळ अर्थ 'धार्मिक विधीने पत्नी कर' असा आहे. पण नीलकंठाचा ग्रह भीष्म अगोदरच विवाहित होते असा झाला असल्याने त्याने त्या शब्दाचा अर्थ 'ब्रह्मचर्यसंकल्पात्प्रभृति त्यक्तान् संतत्यर्थमङ्गीकुरु' (तू ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केलीस, तेव्हापासून आपल्या पत्नीचा त्याग केला होतास तिचा संततीकरिता पुनः अंगीकार कर) असा केला आहे, पण तो ओढाताणीचा आहे, हे संस्कृतचे सामान्य ज्ञान असलेला कोणीहि सांगेल. नीलकण्ठ म्हणतो तसा अर्थ विवक्षित असता तर सत्यवतीने खालीलसारखा शब्दप्रयोग केला असता---

दारांश्चैवाभिगच्छ त्वं मा निमज्जीः पितामहान् ।।

या ठिकाणी सत्यवती भीष्मांना संतत्यर्थ विवाह करण्याचा आदेश देते त्यावरून त्यांचा यापूर्वी विवाह झाला नव्हता हे उघड आहे. **वर दिलेले श्लोक याच क्रमाने सर्व आवृत्तीत** (भांडारकर मंडळाच्या आवृत्तीतहि) **याच शब्दांत व याच क्रमाने आढळतात.** तेव्हा त्याच्या खरेपणाविषयी संशय नाही.

भीष्म विवाहित होते अशी समजूत कशी झाली ?

पण मग 'भीष्म विवाहित होते, त्यांनी स्त्रीसंगत्यागाची प्रतिज्ञा केली होती' अशी समजूत कशी प्रचलित झाली, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर येणेप्रमाणे---

भीष्मांची प्रतिज्ञा अत्यंत कठोर होती. ऐश्वर्य, आरोग्य, इत्यादि सर्व परिस्थिति अनुकूल असता आमरण ब्रह्मचर्याचे आचरण करणे याला फार मोठा इंद्रियनिग्रह आवश्यक आहे. तो भीष्मांनी आपल्या पित्याच्या सुखाकरिता आनंदाने केला हे पाहून अप्सरा, देव व ऋषि यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली,

अनुक्रमणिका

असे महाभारतात म्हटले आहे. तसेच त्यांचे पूर्वीचे नाव देवव्रत होते तरी तेव्हापासून त्यांनी त्यांचे भीष्म असे नाव ठेवले असेहि म्हटले आहे.

ततोऽन्तरिक्षेऽप्सरसो देवाः सर्षिगणास्तदा ।
अभ्यवर्षन्त कुसुमैर्भीष्मोऽयमिति चाब्रुवन् ॥

अविवाहित अवस्थेत ब्रह्मचर्याचे पालन करणे यापेक्षा विवाहित असताना ते करणे याला शतपट इंद्रियनिग्रह लागतो. अशा ब्रह्मचर्य व्रताला असिधाराव्रत अशी संज्ञा आहे. असिधाराव्रत म्हणजे तरवारीच्या धारेवर उभे राहण्याचे व्रत. हे जसे अत्यंत कठीण, तसेंच विवाहित तरुण स्त्रीपुरुषांनी इंद्रियनिग्रह करून ब्रह्मचर्यव्रत पाळणे हे कठीण आहे—युवा युवत्या सार्धं यन्मुग्धभर्तृवदाचरेत् । अन्तर्निवृत्तसंगः स्यादसिधाराव्रतं हि तत् ॥ अशी या व्रताची व्याख्या कोशकारांनी दिली आहे. असे हे खडतर व्रत भगवान् रामचंद्रांनी चौदा वर्षे आचरले. भीष्माची प्रतिज्ञा ऐकून देव व ऋषि यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली. तेव्हा त्यांचेहि ब्रह्मचर्यव्रत या प्रकारचेच अत्यंत खडतर असले पाहिजे असे वाटून ते विवाहित असूनहि ब्रह्मचर्याचे आचरण करीत होते ही कल्पना प्रचलित झाली आणि नंतर त्यांच्या प्रतिज्ञेत स्त्रीसंगत्यागाचा निर्देश घुसडला गेला असे दिसते. कदाचित् ब्रह्मचर्य आचरण करणे म्हणजे काय याचा स्पष्ट अर्थ सांगणे हाहि हे श्लोक घुसडण्यात हेतु असावा. अशा तऱ्हेची अनेक स्थळे दाक्षिणात्य पाठपरंपरेत आढळतात. म्हणून त्या पाठपरंपरेतील केवळ आदिपर्वातीलच श्लोकसंख्या सुमारे १३०० श्लोकांनी अधिक झाली आहे. या पाठपरंपरेविषयी कै. डॉ. सुखटणकर लिहितात—Not only is the Southern text thus appreciably longer than the other, the story itself of the Southern recension, as compared with that of the Northern, is, owing to many of these additions, much richer in details, leaving little or nothing to the imagination of the reader or the hearer.' (दाक्षिणात्य पाठपरंपरेत उत्तरेतील पाठपरंपरेपेक्षा अधिक श्लोक आहेत इतकेच नाही तर त्या पाठपरंपरेत त्यायोगे जास्त बारीकसारीक गोष्टी आल्या आहेत. त्यामुळे वाचकांना किंवा श्रोत्यांना फारच थोड्या ठिकाणी आपली कल्पनाशक्ति लढवावी लागते.)

मैथुनवर्जनाचे किंवा स्त्रीसंगत्यागाचे उल्लेख दाक्षिणात्य पाठपरंपरेतच आढळतात, हे मागे दाखविले आहे. त्याचा उद्देश ब्रह्मचर्याचे स्पष्टीकरण करणे हाच असावा. मूळपाठात ते उल्लेख नव्हते इतकेच नाही तर 'तू आता विधिवत् विवाह कर' या सत्यवतीच्या सांगण्यावरून **भीष्मांचा त्यापूर्वी विवाह झाला नव्हता** हे स्पष्ट आहे.

卐

ज्ञानेश्वरांचा ‘ क्षोभ ’

डॉ. अ. ना. देशपांडे

‘ आनंदच आनंद ’

सौंदर्यजलाने न्हाऊन निघालेली एखादी वस्तु पाहिली म्हणजे काय वाटते ? लावण्यसंपन्न अंगनेचे मोहमयी दर्शन घडले म्हणजे काय वाटते ? ‘मेघदूता’तल्या मधुर रसवत्तेचे प्राशन केल्यानंतर काय वाटते ? जणु ‘ नादब्रम्हच मुसे आले ’ असे वाटावे अशा कोटीतले अभिजात वक्तृत्व ऐकावयास मिळाले म्हणजे काय वाटते ? असल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपण नेहमीच आणि अगदी सहज रीतीने एकाच शब्दात देऊन टाकतो. तो शब्द म्हणजे ‘ आनंद ’. ‘ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ’ या दोन संज्ञा आपण एकत्र आणतो. कारण आनंद हाच सौंदर्यास्वादाचा परिणामवाचक शब्द, असा ग्रह आपल्या मनात पक्का घर करून बसलेला असतो. सौंदर्यदर्शनामुळे वा एखाद्या ललितप्रकृति वाङ्मयीन कृतीच्या वाचनामुळे वा अन्य स्वरूपाच्या एखाद्या कलाकृतीच्या आस्वादामुळे रसिकाची प्रतिक्रियारूप अशी जी मानसिक अवस्था होते तिचें विवेचन साहित्य-शास्त्राला वाहिलेल्या अनेक मराठी पुस्तकातून आलेले आहे. ‘ लेखनकला ’, ‘ सौंदर्य आणि ललितकला ’, ‘ अभिनव काव्यप्रकाश ’, ‘ काव्यालोचन ’, ‘ सारस्वत समीक्षा ’, ‘ प्रतिभासाधन ’, ‘ ललितकलामीमांसा ’ ही त्या प्रकाराची सहज आठवणारी काही पुस्तके. ही पुस्तके वरवर चाळून पाहिली तरी उपरोक्त मनोवस्थेचा वाचक म्हणून ‘ आनंद ’ हाच शब्द त्यातून अनेक ठिकाणी वापरलेला आढळून येण्याची शक्यता आहे. आस्वादविषय झालेल्या सौंदर्याचे स्वरूप कोणतेहि, कसेहि व काहीहि असो, त्याच्या परिणामस्वरूप दिग्दर्शनाकरिता ‘ आनंद ’ हा शब्द वापरण्याची आपणास सवय पडून गेलेली आहे. ‘ आनंद ’ हा शब्द आपण अगदीच गुळगुळीत आणि बुळबुळीत करून टाकलेला आहे, अगदीच वेचव करून सोडलेला आहे. त्याला काटेकोरपणा कसा तो माहितच नाही. टोकदारपणा कसा तो त्याच्या अंगी उरलेलाच नाही. मनाची कोणतीहि सुख-संवेदनात्मक अवस्था असो; तिची जाणीव झाली रे झाली की तिच्याकडे या ‘ आनंदा ’चे टोक वळलेच म्हणून समजा; इतका तो बिनबुडाचा झालेला आहे. सगळीकडे सगळा आनंदच आनंद आहे ! केवळ सौंदर्यपरिणामापुरताच तो मर्यादित नसून जीवनातल्या इतर अनेक क्षेत्रातूनहि तो उतू जात आहे. जलक्रीडे-

तहि आनंद आणि मिष्टान्नसेवनातहि आनंद ! कादंबरी वाचनातहि आणि कुस्ती जिंकल्याचाहि आनंद ! पुत्रप्राप्तीचाहि आनंद आणि कर्ज फिटल्याचाहि आनंद ! समाधिसुखाचाहि आनंद आणि विषयसुखातहि आनंद ! असा हा सर्व आनंदच आनंद !

आनंदाचे हाल

या 'आनंदा'चे असे हाल कां होतात ? याचे कारण हेच की जीवनातल्या नानाविध अनुभवाप्रमाणे सौंदर्यास्वादाच्या परिणामस्वरूप अशा मानसिक अवस्थातहि अनेक भेद असतात या वस्तुस्थितीचे विस्मरण होते. वस्तुतः एखाद्या सौंदर्यविशेषाचे न्याय्य रसग्रहण करावयाचें असेल तर त्याच्या आस्वादामुळे रसिकाच्या ठिकाणी घडून येणाऱ्या मानसिक स्थित्यंतराचे अचूक निदान करून त्याचे अत्यंत समर्पक आणि समर्थ अशा शब्दप्रयोगाच्या द्वारे वर्णन करणे आवश्यक ठरते. आपण मात्र कोणत्याहि प्रकारच्या सौंदर्याच्या परिणामाचे निवेदन करावयाचे असल्यास 'आनंद' या भोंगळ शब्दप्रयोगाला शरण जातों. खऱ्या सौंदर्यदृष्टि रसिकाने या बाबतीत अतिशय चोखंदळ राहिले पाहिजे. समजा 'अनिलां'च्या 'भग्नमूर्ती'चे किंवा विभावरी शिरुरकरांच्या 'बळी'चें वाचन केल्यानंतर अथवा गडकऱ्यांच्या 'एकच प्याला'चा प्रयोग पाहिल्यानंतर आम्हाला 'आनंद' वाटला असे जर आपण म्हटले तर या ठिकाणी त्या कृतीच्या अपेक्षित परिणामाचे न्याय्य दिग्दर्शन करण्यास 'आनंद' हा शब्द योग्य ठरेल काय ? अचूक, समर्पक व परिणामकारक शब्दयोजना करण्याच्या कौशल्यावर रसिकाच्या रसिकत्वाची इयत्ता बरीचशी अवलंबून आहे. एखाद्या महासागराचे वर्णन आपण करताना म्हटले—'हा भला मोठा पाण्याचा साठा आहे', हिमालयासंबंधी बोलताना म्हटले—'हा भला मोठा डोंगर आहे'; किंवा नेहरूंचा गौरव करताना म्हटले—'हे एक हिंदी गृहस्थ आहेत',—ही तीन वर्णने ठोकळ मानाने खरीच आहेत. पण त्या त्या वस्तूच्या व व्यक्तीच्या खास वैशिष्टयांचा उद्घोष करण्याच्या कामी ती खरोखर उपयुक्त आहेत काय ?

ज्ञानेश्वरांची करामत

ज्ञानेश्वरांसारखे जे सूक्ष्म सौंदर्यदृष्टीचे मर्मज्ञ कवि असतात ते अचूक शब्दयोजनेच्या बाबतीत सदैव दक्ष असतात. अतिशय सूक्ष्म आणि अतिशय मार्मिक सौंदर्यदृष्टि हे ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वाचे एक अत्यंत विलोभनीय असे अंग आहे. 'ज्ञानेश्वरी'पेक्षाहि 'अमृतानुभवा'त तर ते विशेष बहारदार आणि मनोज्ञ स्वरूपात प्रकट झालेले आहे. 'अमृतानुभवा'तली प्रत्येक ओवी जणु सौंदर्याची खाण आहे ! या विश्वसंचालनाच्या मागे असलेल्या

प्रेरक चैतन्यशक्तीचा शोध घेणारे कैक दर्शनदार आजपर्यंत जगांत झाले असतील. त्यापैकी जेवढे ज्ञात आहेत त्यात चैतन्याचा आपला शोध सौंदर्यानुभूतीच्या माध्यमातून अभिव्यक्त करणारा प्रभावी दर्शनकार कोण, असा जर प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देणाराला ज्ञानेश्वरानंतर दुसरे नाव आठविणे चांगलेच कठीण जाणार आहे. ज्ञानेश्वर हे खरे तत्त्वज्ञ; त्याचबरोबर ते अलौकिक सौंदर्यदृष्टीनेहि संपन्न; त्याशिवाय ते विशुद्ध विनयभावनेहि विभूषित. सत्य, शिव आणि सौंदर्य या तिन्ही शक्ति आपल्या शुद्ध स्वरूपात एकात्म होऊन, एकजीव होऊन जणु काही ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वाच्या रूपाने अवतीर्ण झालेल्या आहेत. सर्वांगीण विकासाचे साक्षात मूर्त स्वरूप असलेल्या ज्ञानेश्वरांनी सौंदर्याच्या परिणामासंबंधी एक अत्यंत सूचक आणि अन्वर्थक असा शब्द एकदा 'ज्ञानेश्वरी'त व एकदा 'अमृतानुभवा'त उपयोजिलेला आहे. त्या शब्दाची ओळख करून घेणे हाच हा लेख लिहिण्यामागचा हेतु आहे.

सौंदर्य, अस्वस्थता व क्षोभ

ही ओळख करून घेण्याआधी आपण आपल्यालाच एक प्रश्न विचारूं या. सौंदर्यदर्शनानंतर खरोखर आपली कोणत्या प्रकारची अवस्था होते ? माझाच अनुभव मी सांगतो. असल्या प्रसंगी मी अस्वस्थ होतो. आपण आपल्या मनात या जीवनाची, समग्र विश्वकल्पनेची जी एक संगति, जी एक व्यवस्था लावलेली असते ती व्यवस्था, सौंदर्यदर्शनामुळे घडून येणाऱ्या दृष्टचन्तरामुळे मोडावी लागते आणि त्या सौंदर्यातून प्रतीत झालेल्या साक्षात्काराशी सुसंवादी अशी नवी अवस्था रचावी लागते. जुन्याच्या मोडतोडीचे आणि नव्याच्या मांडामांडीचे हे काम काय सुखाचे आणि आरामाचे आहे ? अर्जुनहि सौंदर्यदर्शनानंतर असाच अस्वस्थ झाला होता, प्रक्षोभित झाला होता. तो प्रसंग गीतेच्या अकराव्या अध्यायातला आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला आपले भव्यभीषण असे विश्वरूप दाखविले. ज्ञानेश्वरांनी वापरलेल्या रूपकाच्या आश्रयाने बोलायचे म्हटले तर असे म्हणता येईल की श्रीकृष्णांनी अर्जुनाला विश्वरूपपटाची एकेक घडी उकलून दाखविली. त्या योगेश्वर हरीने

दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम्

पार्थाला आपल्या ऐश्वर्यसंपन्न अशा रूपाचे दर्शन घडविले. त्या रूपपटाची पहिलीच घडी अत्यंत उज्ज्वल, अत्यंत दिव्य, अत्यंत पवित्र अशा सौंदर्यातिशयाने मंडित झालेली होती.

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलोचनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥

विश्वरूपाच्या या दिव्य पैलूची प्रचीति घडविण्याकरिता त्यांतील तेजस्विता जिवंत व मूर्त स्वरूपात आपल्या डोळ्यापुढे साक्षात प्रकट करण्याकरिता ज्ञानेश्वरांनी भव्य स्वरूपाच्या अशा एकाच वेळी तेजोगर्भ व गंधपूर्ण असलेल्या निसर्गदृश्यांचे माध्यम किती बहारीने वापरले आहे हे पाहण्यासारखे आहे. प्रकाश आणि सुगंध यांचा अपूर्व संयोग जीत झालेला आहे अशी उभयेंद्रियरम्य दृश्यमालिका ज्ञानेश्वरांनी या ओव्यातून निर्माण केलेली आहे.

स्वर्गीं सूर्यतेज वेढिलें । जैसे पंधरेनें मेरुतें मढिलें ।
तैसे नितंबावरी गाढिलें । पीतांबरु झळके ॥

श्रीमहादेवो कापुरें उटिला । कां कैलासु पारजे डवरिला ।
नाना क्षीरोदकें पांघरविला । क्षीरार्णवो जैसा ॥

जैसी चंद्रमयाची घडी उपलविली । मग गगनाकरवीं वुंधी घेवविली ।
तैसी चंदनपिंजरी देखिली । सर्वांगीं तेणें ॥

जेणें स्वप्रकाशा कांति चढे । ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे ।
जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे । वेववतीये ॥

जयाचे निर्लेप अनुलेपु करी । जे अनंगुही सर्वांगीं धरी ।
तया सुगंधाची थोरी । कवण वानी ॥

गंधोन्मादाने भारलेले असे हे तेजतुंवळ सौंदर्य पाहिल्यानंतर अर्जुनाची कशी अवस्था झाली हे सांगताना ज्ञानेश्वरांनी लिहिले आहे—

ऐसी एकैक शृंगारशोभा । पाहतां अर्जुन जातसे क्षोभा ।
तेवींचि देवो बैसला की उभा । कां शयाळु हे नेणवे ॥

गंधमय दिव्यत्वाने जणु रसरसलेली अशी ती 'शृंगारशोभा' पाहता पाहता अर्जुनाच्या ठिकाणी 'क्षोभ' उत्पन्न झाला. दिव्य सौंदर्यदर्शनाचा अचूक व यथार्थ परिणाम व्यक्त करणारा 'क्षोभ' हा अत्यंत समुचित शब्द या ठिकाणी ज्ञानेश्वरांच्या लेखणीतून किती सहज बाहेर पडला ! उन्मादक सौंदर्याच्या आस्वादाने ज्याच्या ठिकाणी असा 'क्षोभ' उत्पन्न होत नाही तो रसिक कसला ?

'चढे द्रष्टत्वाचिया क्षोभा'

'क्षोभ' या संज्ञेचा ज्ञानेश्वरांनी याच अर्थात 'अमृतानुभवा'तहि एका ठिकाणी उपयोग केलेला आहे. देवोदेवीच्या प्रगाढ स्वरूपाच्या परस्परप्रीतीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या पहिल्याच प्रकरणात ती ओवी आलेली आहे. स्त्रीपुरुषांच्या अन्योन्य आसक्तीचा अत्यंत उत्कट आणि उद्दाम विलास या पहिल्या प्रकरणात अगदीच मोजक्या, वेचक पण अर्थपूर्ण शब्दात प्रकट झालेला आहे. त्या

देवोदेवीची परस्परानुरक्ति केवळ अनुपम आहे. 'आवडीचेनि वेगें । एक एकातें गिळिती अंगें' अशा स्वरूपाचे त्यांचे एकमेकाविषयीचे आकर्षण विलक्षण कोटी-तले आहे. दोघांच्या या अन्योन्याकर्षणाच्या संदर्भात पुढील ओवी वाचा:—

जियेते पहावयाचिया लोभा । चढे द्रष्टृत्वाचिया क्षोभा ।
जियेते न देखतु उभा । आंगचि सांडी ।।

तिला पाहण्याचा त्याला फार फार लोभ. तिला पाहिले की त्याला क्षोभ चढतो आणि ती दिसली नाही की तो उभ्या अवस्थेतच अंग सांडतो! ती त्याची प्राणेश्वरी आहे, त्याची प्रिया आहे; प्रियेच्या दर्शनाने, प्रेमरसाच्या आस्वादाने म्हणजेच पर्यायाने सौंदर्यानुभूतीने येथे 'क्षोभ' उत्पन्न होतो असे सुचविलेले आहे!

रस, क्षोभ, प्रक्षोभ

'क्षोभ' या शब्दाचे वरील विवेचनात सूचित केलेले हे स्वरूप नीट लक्षात घेतले म्हणजे 'भग्नमूर्ति', 'बळी', 'एकच प्याला' असल्या कलाकृतींच्या सेवनाने किंबहुना यांच्याहूनहि कलादृष्ट्या अधिक उच्चतर दर्जाच्या असलेल्या अशा शेक्सपिअरच्या किंवा सोफोक्लीजच्या शोकान्तिकांच्या आस्वादाने रसिका-च्या मनाची जी अवस्था होते तिला अनुलक्षून 'क्षोभ' हा शब्द वापरणे किती समुचित आहे हे एकदम पटते. संस्कृत साहित्यशास्त्रातली 'रस' ही संज्ञा सौंदर्यस्वादाच्या परिणामाचीच वाचक आहे. या 'रसा'चे समग्र स्वरूप सूक्ष्मपणे न्याहाळले म्हणजे असे दिसेल की तो सुद्धा एक प्रकारचा 'क्षोभ'च आहे. अलौकिकवाद्यांच्या भूमिकेवरून नव्हे तर लौकिकवाद्यांच्या भूमिकेवरून पाहता रसिकाच्या ठिकाणी होणारी एखाद्या रसाची निष्पत्ति म्हणजे त्या रसाशी संलग्न असलेल्या स्थायीभावाचे उद्दीपनच आहे. म्हणजे मनाचे एक प्रकारचे अस्वस्थ होणेच आहे, एक प्रकारे प्रक्षोभित होणेच आहे! एखादा चित्रपट पाहत असताना आपण जेव्हा वीररसाचा वा उत्तान शृंगाररसाचा वा उत्कट करुणरसाचा अनुभव घेतो तेव्हा आपल्या शरीराची व मनाची एकंदर अवस्था कशी होते हे प्रामाणिकपणे आठवावे म्हणजे रसाचा गाभा शोभायमान नव्हे तर क्षोभायमान कसा आहे, क्षोभाने कसा व्यापलेला आहे हे एकदम पटते. 'प्रक्षोभ' नावाचा आणखी एक रस मानावा अशी मागे आत्माराम रावजी देशपांडे यांनी एक सूचना केली होती. ती ग्राह्य तर आहेच, पण त्याशिवाय तिला अधिक व्यापक स्वरूप देणे आवश्यक आहे. 'प्रक्षोभ' हाच खरा एकमेव रस आहे. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्‌भुत ही त्याची अष्टविध अंगे आहेत. शांत रस हा प्रक्षोभापलीकडचा, प्रक्षोभातीत अवस्थेतला रस आहे. क्षोभ संपतो तेथे शांत रस सुरू होतो. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'च्या

अनुक्रमणिका

दुसऱ्या अध्यायात शांत रसाचा अनुभव घेणाऱ्या प्राप्त पुरुषाचे वर्णन करताना लिहिले आहे--

तैसा प्राप्तीं ऋद्धिसिद्धि । तयासि क्षोभु नाही बुद्धी ।
आणि न पवतां न बाधी । अधृति तयातें ।।

त्याच्या आधीच्या ओवीमध्ये 'जैसी अक्षोभता सागरीं । अखंडित' तशी 'अक्षोभता' त्याच्या ठिकाणी असते असे त्यांनी स्पष्टपणेच सांगितलें आहे. म्हणजे क्षोभ ओसरल्यावरच शांत रसाचे आस्वादन सुरू होते, शक्य होते असे त्यांनी पर्यायाने येथे सूचित केलेलें आहे ! क्षोभ उत्पन्न करणे म्हणजे अष्टरसांपैकी कोणत्याहि एका रसाची ज्याने निष्पत्ति होईल, असें वाङ्मय लिहिणे सोपे आहे; पण क्षोभाचे परिशमन करून शांतरसाचा आस्वाद घडविणारे वाङ्मय निर्माण करणे हे विशेष कर्तबगारीचे आणि असाधारण कौशल्याचे काम आहे. ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'त व 'अमृतानुभवा'तहि ते काम अपार आत्मविश्वासाने व सहज लीलेने पार पाडले आहे !

महानुभावीय वाङ्मयात 'क्षोभ'

ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या आधाराने मांडलेला हा क्षोभप्रपंच कदाचित काही जागत्या वाचकांना अशांत करील, प्रक्षोभित करील अशी मला धाकधुक वाटत आहे. महानुभावीय वाङ्मयाचे अभ्यासक असे म्हणतील की "ही सगळी क्षोभ-मीमांसा चूक आहे; कारण क्षोभ हा मनास प्रसन्न करणारा आहे." डॉ. वि. भि. कोलते यांच्यासारख्या महानुभावीय वाङ्मयाच्या व्यासंगी संशोधकांनी संपादि-लेल्या ग्रंथाचाहि अशा वाचकांना आधार सापडण्यासारखा आहे. डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या भास्करभट्टाच्या शिशुपालवधात पुढील ओवी आलेली आहे. नारद श्रीकृष्णाची स्तुति करत आहे असा त्या ओवीचा संदर्भ आहे.

बरवेयां देवां दीक्षागुरू : नागरां देवां क्षोभ करू
उदारां देवां सुधाकरू : तुं कृष्णराया

येथे 'क्षोभकर' या शब्दावर महानुभावी टीपकाराने टीप दिली आहे : 'क्षोभकर =क्षोभवीतां एवं लाजवीता !' डॉ. कोलते यांनी या शब्दावर पुढीलप्रमाणे टीप दिलेली आहे. 'क्षोभकर : संतुष्ट करणारा; क्षोभ=संतोष; क्षोभणें=प्रसन्न होणें.' या अर्थाला पोषक अशी त्यांनीच संपादिलेल्या 'उद्धगीतते'तील ओवीहि त्यांनी तेथे उद्धृत केली आहे. सनकादिकापुढे ईश्वर हंसरूपाने प्रकट होतो असा तो प्रसंग आहे.

तेव्हाळि तिए अस्थानीं : मी आलां हंसाचें रूप धरूनि
तंव क्षोभले मातें देखोनि : सनकादिक

महानुभावीयांच्या इतरहि काव्यात 'क्षोभ' हा शब्द कोणत्या अर्थाने आलेला आहे हे पाहणे येथे आवश्यक आहे. डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरातील पुढील दोन ओव्या पाहा :

भीमें विहंगमाची पाहिली : तंव तेणे क्षोभाची वुंथि सांडिली
जीवीं देवो वरुनि दृष्टि घातली : विदावंतावरी ।।
किन्नरासि श्रीकृष्ण वागितां अनुरागीं : क्षोभु उपनला देविचां आंगीं
तया वेधाची जाली वज्रांगी : साहे विरहो उपचारू ।।

येथे 'क्षोभ' म्हणजे प्रसन्न होणे हा अर्थ अर्थातच अभिप्रेत नाही. महानुभावीय टीपकाराने येथे 'क्षोभु : गहनता' अशी टीप दिलेली आहे. खुद्द डॉ. कोलते यांनी या काव्याच्या शेवटी दिलेल्या शब्दकोशात 'क्षोभ = राग, तगमग, तळमळ' असा अर्थ दिलेला आहे. तो त्यांनी 'शिशुपालवधा'त सुचविलेल्या 'प्रसन्न होणे' या अर्थाशी न जुळणारा आहे.

डॉ. य. खु. देशपांडे यांनी संपादिलेल्या 'ऋद्धिपूरवर्णना'त ईश्वरगुणानुमोदनाच्या निमित्ताने पुढील ओवी आलेली आहे.

जो अगाधु अक्षोभु : अव्यक्त अनादि स्वयंभु :
तो मायावेषें श्रीप्रभु : अवतरिला ।।

या ओवीत किंवा पंडित विश्वनाथाच्या 'ज्ञानप्रबोधा'तील

सुष्टेशीं करी लोभु । दुष्टेशीं चाळी क्षोभु ।
तर अपयश वाचेनि प्रभु ! । तिये आण नाही ।।

या ओवीतहि क्षोभ = प्रसन्न होणे या अर्थाला आधार सापडत नाही.

क्षोभ म्हणजे काय ?

'क्षोभ' या शब्दाच्या अर्थावर आपटे संस्कृत कोश काय प्रकाश टाकतो तेहि पाहण्यासारखे आहे. या कोशांत क्षुभ=To Shake, to tremble, to be agitated or disturbed असा अर्थ दिलेला आहे. तो लक्षात घेतला असता, क्षोभ म्हणजे विकारांचे उद्दीपन या अर्थाला मान्यता देणे आवश्यक आणि न्याय्य ठरणार आहे. क्षोभ काय किंवा इंग्रजीतली Excitement काय यात दोन प्रकार संभवतात. सुखदायक आणि दुःखदायक. काही विकार सुखवितात; काही दुःख देतात; काही रस दिल खुलवितात तर काही डोळ्यात अश्रु आणून रडवितात, काही भिववितात तर काही चकित करतात; पण सगळेच रस

अनुक्रमणिका

क्षोभवितात. 'क्षोभ' शब्दाची ही व्याप्ति लक्षात घेतली म्हणजे सुखदायी विकार उचंबळून येणे म्हणजेच प्रसन्न होणे याहि अर्थाला मान्यता देणे शक्य होणार आहे.

'क्षोभ' या शब्दाचे हे जे धावते आणि केवळ रूपरेषात्मक निरूपण करण्यात आले आहे त्याचे प्रयोजन उघड आहे. सौंदर्यास्वादामुळे किंवा श्रेष्ठ प्रतीच्या वाङ्मयाच्या सेवनामुळे रसिकाच्या मनाची जी अवस्था होते तिचे यथार्थ वर्णन करण्याच्या कामी 'क्षोभ' या शब्दाची सयुक्तिकता पटावी हे ते प्रयोजन आहे. 'शिशुपालवध'कर्त्या भास्करभट्ट बोरीकरांनी अप्रत्यक्षपणे या सूचनेला संमति दिलेली आहे. रसपूर्ण काव्य रसिकाला क्षोभविते हे मत त्यांना मान्य आहे. त्यांच्या 'शिशुपालवधा'तील पुढील दोन ओव्या पाहा.

साहित्याचेनि परिमळें : श्रृंगाराचेनि मेळे
प्रबंध होती मातावळें : कविजनांचे ॥
रसाळीं बोलीं : काव्यें झालीं मातावळीं
तीएं ठाकों न ल्हाति जवळी : स्यां गाउवां ॥

येथे कवीश्वर म्हणतात : रसाळ काव्ये मातावळी असतात, रसिकाला मातवितात! (या ठिकाणी हिंदीमधील 'मतवाला' या शब्दाचे स्मरण होऊ देणे योग्य ठरेल काय?) रसपूर्ण काव्ये मातवितात म्हणजेच क्षोभवितात, क्षोभ उत्पन्न करतात! आपण हे पाहिलेच आहे की ज्ञानेश्वरहि सौंदर्याच्या परिणामाचा वाचक म्हणून 'क्षोभ' या शब्दाचा उपयोग करतात.

प्रक्षोभ हा एकच प्रमुख रस

असा हा ज्ञानेश्वरांचा 'क्षोभ' आहे. त्याने एक नवा विचार सुचविला आहे. तो वर आलाच आहे, तरीहि पुन्हा मांडतो. प्रक्षोभ हा एकच प्रमुख व सर्वव्यापी रस. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्‌भुत हे त्याचे आठ संभाव्य प्रकार. शांत रस हा या आठापलीकडचा, कारण तो क्षोभ ओसरल्यानंतरचा.

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून, सौंदर्यास्वादात किंवा कोणत्याहि प्रकारच्या रसप्रतीतीत आनंद नाही, क्षोभ आहे हे पटावे. इतक्याहि उपर न पटल्यास मग आनंदच आहे.

विचारांचे विश्व

लेखक—साक्षी

[हे एक नवे सदर या अंकापासून सुरू होत आहे. ते पुढील प्रत्येक अंकात नियमाने येत जाईल, अशी अपेक्षा आहे. —संपादक]

हे 'विचारांचे विश्व' आहे. यात विचारांचा, विचार-प्रणाल्यांचा विचार जसा अभिप्रेत आहे, तसाच विश्वाचाहि विचार अभिप्रेत आहे. विचार विश्वात्मकच असतो. विश्वातील कोणत्या ना कोणत्या लहान-मोठ्या घटनांना अनुलक्षूनच विचारप्रक्रियेला प्रारंभ होत असतो. म्हणून विश्वाला सोडून विचार संभवतच नाही. त्याचप्रमाणे विचाराला विवर्जून विश्वहि संभवत नाही.

विचार म्हणजे काय ?

प्रथमत: 'विचार' म्हणजे काय, हे काटेकोरपणे स्पष्ट केले पाहिजे. 'विचार' या शब्दात मूळ धातु 'विच्' असा आहे, 'चर्' असा नाही, हे कटाक्षाने घ्यानात घेतले पाहिजे. 'चर्' म्हणजे चलन करणे, चालणे, भटकणे, दिशाशून्य रीतीने विहार करणे. चालणाऱ्याला विविक्षित, नेमक्या दिशेलाहि जाता येते, पण हे विचारावाचून संभवत नाही. केवळ चलन, चालणे, भटकणे, हे 'चर्' या धातूतून निर्दिष्ट होते. पण विशिष्ट दिशा, विशिष्ट हेतु, विशिष्ट साध्य, यांना अनुलक्षून गतिमान होताच त्या चलनाला, गमनाला, भ्रमणाला विचारांचे, 'विच्' या धातूचे, या धात्वर्थाचे अंग जोडले जाते.

म्हणून 'विचार' या शब्दाचा विचार करताना 'चर्' या धातूवर जोर नसून 'विच्' या धातूवर, धात्वर्थावर जोर असतो, हे प्रथमतःच व पक्केपणी घ्यानात घेतले पाहिजे.

'विच्' म्हणजे विलग विलग करणे, स्पष्ट व रेखीव अर्थाववोधासाठी विभाग करणे, भेद करणे, अंगांग अलग अलग करून ज्ञेयवस्तूचे सर्वांगपरिपूर्ण दर्शन घेणे. असे जो करू शकतो त्याला **विचक्षण** म्हणतात. विचक्षण म्हणजे स्पष्टदर्शी, दूरदर्शी, मर्मदर्शी, शहाणा, सुबुद्ध, हुशार, विद्वान.

विचक्षणालाच मराठीत 'विचारी' म्हणण्याचाहि प्रघात पडला आहे. पण 'विचारी' या शब्दाच्या उपयोगात 'विच्' पेक्षा 'चर्' या धातूचे, धात्वर्थाचे प्राबल्य ध्वनित होते. म्हणून गोंधळ होण्याचाहि संभव असतो. विचारात गोंधळाला यत्किंचितहि स्थान नसते. किंबहुना, जे गोंधळाचे असते ते

भेदून, परीक्षून, पिंजून, पाखडून स्वच्छ करण्यासाठीच विचाराचा अवतार असतो. दिशाशून्य, हेतुशून्य, लक्ष्यशून्य, वेताल, मनातल्यामनात होणाऱ्या भ्रमणाला विचार म्हणत नाहीत. केवळ मानसिक भिरंगणे म्हणजे विचार करणे नव्हे. उलट, हे वेताल मानसिक भिरंगणे थांबवून, निरोधून, अवरोधून, विसंगत ते विवर्जून सुसंगत ते निवडून काढणे, म्हणजेच विचार करणे. मनात स्वाभाविकपणे उठणाऱ्या वृत्ति-तरंगांना स्तब्ध केल्याशिवाय, आवरून धरल्याशिवाय विचार संभवतच नाही, हे कटाक्षाने ध्यानात घेणे अत्यावश्यकच नव्हे, तर मूलगामी महत्त्वाचे आहे.

मनात उठणारे, अनिच्छेने स्फुरत राहणारे वेताल, बेबंद वृत्तितरंग म्हणजे विचार नव्हे. मनात उठणारे स्वाभाविक, नैसर्गिक वा प्राकृतिक तरंग हे विचार नसून ते विचाराचे 'विषय' आहेत. म्हणजे ते 'ज्ञेय' आहेत. ज्याचा विचार करावयाचा असे ते आहेत. विचार आणि विचाराचा विषय हे मूलतःच भिन्न असतात. म्हणून त्यांची गल्लत करणे, सहजपणे मनात स्फुरणाऱ्या तरंगांनाच विचार हे नाव देणे, हा भ्रमिष्टपणा आहे.

विचाराचा आकार

विचार म्हटला की त्यात ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान, ही त्रिपुटी आलीच. ही त्रिपुटी म्हणजे विचाराचा आकार होय. विचाराला स्पष्ट आकार आल्याशिवाय सुस्पष्ट बोध, रेखीव व निश्चयात्मक ज्ञान वा दर्शन संभवतच नाही. म्हणून विचार निराकार नसून साकार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. साकार आणि निराकार हे दोन्ही विचाराचे विषय होऊ शकतात. जे साकार ते विचाराचा विषय होताच त्याचे भेदन, च्छेदन, परीक्षण, संशोधन सुरू होते, त्याच्या अंगांगांचे विलगीकरण करून त्यांच्या सर्वांगपरिपूर्ण यथार्थरूपाची जाणीव करून घेण्याची प्रक्रिया सुरू होते. आणि जे निराकार ते विचाराचा विषय होताच त्याला साकार करण्याची प्रक्रिया सुरू होते. साकारता आल्याशिवाय, आणल्या गेल्याशिवाय निराकाराचा बोधच संभवत नाही. 'निराकार' हा केवळ शब्द आहे. त्या शब्दाने सूचित होणारा अर्थ, विचाराने त्याला साकारता आणल्याशिवाय, कळूच शकत नाही.


म्हणून निराकाराला साकारता आणणे आणि साकाराच्या अंगोपांगांचे भेदन करून, पृथक्करण करून त्यांचे परस्परसंबंध कशा प्रकारचें आहेत हे स्पष्टपणे जाणून घेणे, याचे नाव विचार. विचार म्हणजे विचक्षणा, विशेषेन ईक्षण, दर्शन.

खुद्द 'विचार' ही निराकार वस्तु नाही. ती स्वतः साकार वस्तु असून निराकारालाहि साकारात आणून त्याचे यथार्थ दर्शन घेण्याची शक्ति विचारात आहे. विचाराचा आकार कोणता ? ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान या त्रिपुटीने बनणारा जो त्रिकोण, तोच विचाराचा आकार.

विचाराचा त्रिकोण

केवळ रेषा हे विचाराचे रूप नव्हे. केवळ एका रेषेत भटकत जाणे, हेहि विचाराचे रूप नव्हे. मनात उठणारे वेताल तरंग हे विकीर्ण रेषात्मक असतात. कोणत्याहि तरंगाचा, तरंगपुंजाचा अर्थ जाणून घ्यावयाचा झाल्यास त्याला ज्ञानाच्या त्रिपुटीत, विचाराच्या त्रिकोणात आणून बसवावे लागते. त्या तरंगाला ज्ञेय कल्पून, त्याचा आणि आपला म्हणजे ज्ञात्याचा संबंध कशा प्रकारचा आहे, हे समजून घ्यावे लागते. आणि या संबंधाचे यथार्थरूप कळले की तेच यथार्थ ज्ञान होते.

विचाराचा विषय होणारी वस्तु ही एक रेषा; विचाराचा जे ज विषय होते ते ते ज्ञेय; म्हणून या रेषेला '**ज्ञेय-रेषा**' असे नाव देता येते. या ज्ञेयाचा ज्ञात्याशी संबंध कशा प्रकारचा आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न, म्हणज ज्ञेयरेषेच्या एका टोकाला कोन करून जाणारी दुसरी रेषा. ज्ञात्याच्या प्रयत्नामुळे ही रेषा आकारास येत असल्यामुळे हिला 'ज्ञाता-रेषा' असे नाव देता येते. आणि शेवटी, ज्ञात्याचा हा प्रयत्न सफल होऊन जे ज्ञान आकारास येते, ती तिसरी रेषा. ही रेषा परत ज्ञेयाकडेच वळली पाहिजे. कारण ज्ञान जे व्हावयाचे असते ते ज्ञेयाचेच. म्हणून ही तिसरी रेषा परत ज्ञेय-रेषेच्या दुसऱ्या टोकाला येऊन मिळते. ज्ञेय-रेषेच्या एका टोकापासून ज्ञात्याची ज्ञानप्रक्रिया सुरू होते व ज्ञाता-रेषा ज्ञेयरेषेला कोन करून आकारास येते. आणि ही ज्ञान-प्रक्रिया पूर्ण झाली म्हणजे ज्ञाता-रेषा ज्ञेय-रेषेच्या दुसऱ्या टोकाला येऊन मिळते. आणि अशा रीतीने विचाराचा त्रिकोण तयार होतो. हा त्रिकोण येणेप्रमाणे रेखांकित करता येईल.



या ज्ञानत्रिपुटीचा अथवा विचार-त्रिकोणाचा वैदिक दार्शनिकांनी शास्त्रशुद्ध रीतीने जेवढा सूक्ष्म, गहनगभीर व सर्वांगपरिपूर्ण विचार केलेला आहे तेवढा कोणत्याहि काळांतील, कोणत्याहि देशांतील, कोणत्याहि विचारवंतांनी केलेला नाही. या त्रिपुटीचा वा त्रिकोणाचा विचार म्हणजे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या तीन्ही पदांचा सांगोपांग विचार. पैकी कोणत्याहि एकाच पदाचा, वा दोन पदांचा विचार हा पूर्ण विचार नसून अर्धवट होय. विचाराचा विषय क्षुल्लक असो वा गहनगभीर असो, त्या विचारात ही त्रिपुटी असतेच असते. आणि पूर्ण विचार म्हणजे समग्र त्रिपुटीचा, त्रिपुटीतील प्रत्येक पदाचा परस्परसंबंधानुगामी साकल्यात्मक बोध.

विचार-त्रिकोणाची विश्वव्यापकता

विचाराचा त्रिकोण वर जो रेखांकित केलेला आहे त्यावर लक्ष केंद्रित करता असे दिसून येईल की, समग्र विश्वविचार ज्यात अंतर्भूत केला जाऊ शकतो असा हा विश्वव्यापी त्रिकोण आहे. **ज्ञेय-रेषा** ही विचाराचा विषय होणाऱ्या कोणत्याहि वस्तूची, आब्रह्मस्तंभपर्यंतच्या कोणत्याहि दृश्यादृश्य, व्यक्ताव्यक्त प्रमेयाची निदर्शक होऊ शकते. त्याचप्रमाणे **ज्ञाता-रेषा** ही एका व्यक्तीपासून सर्व जीवांची निदर्शक रेषा होऊ शकते. आणि ज्ञान-रेषा ही कोणत्याहि क्षुद्र वा महत्वपूर्ण विषयाच्या यथार्थ वा अयथार्थ ज्ञानाची निदर्शक होऊ शकते. म्हणून विचार हा शब्द विश्व-विचार-वाचकच अंतिमत: ठरतो. आणि म्हणून 'विचारांचे विश्व' या नामाभिधानात विचाराचा विचार जसा येऊ शकतो, तसाच विश्वाचा, विश्वातील कोणत्याहि घटनेचा वा वस्तूचा विचारहि येऊ शकतो.

विचार, प्रमाणे व यथार्थज्ञान

विचार ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. कोणत्याहि विचाराची परिणति ही निश्चित स्वरूपाच्या यथार्थज्ञानातच झाली पाहिजे. कारण विचार हा यथार्थाव-बोधासाठी, यथार्थ ज्ञानासाठीच प्रवर्तित होत असतो. प्रत्येक सजीव प्राण्याला ज्ञानग्रहणशक्ति ही स्वभावत:च असते. किंबहुना ज्ञानग्रहणशक्ति म्हणजेच सजीवता, चेतनता, अशी व्याख्या दार्शनिकांनी केलेली आहे. पण ज्ञानग्रहणशक्ती-मुळे जे ज्ञान ज्ञात्याला वा मानवाला होते, ते यथार्थ असेलच असे नाही. ते भ्रामकहि असू शकते. आणि सामान्यपणे भ्रामक ज्ञानालाच सत्य ज्ञान मानून बसण्याची प्रथा इतकी सर्वांच्याच अंगवळणी पडली आहे की, कोणी काहीहि बोलावे व माझेच खरे, बाकीचे खोटे, असा अट्टाहास करावा! असा अट्टाहास हा यथार्थज्ञानाचा सर्वात मोठा, महाभयंकर व दुर्दमनीय असा शत्रु होय. यथार्थज्ञान हे कोणाच्याहि केवळ व्यक्तिनिष्ठ मतावर अवलंबून राहणारी वस्तु नव्हे; हे नित्य ध्यानात ठेवले पाहिजे. यथार्थज्ञान ही मताची गोष्ट (matter of opinion) नसून ती अस्खलनशील व निर्दोष प्रमाणांनी सिद्ध होणारी वस्तु आहे, आणि ही प्रमाणे सर्वांना मान्य करावीच लागतात. कारण प्रमाणे ही सर्व मानवांना प्राप्त होणारी वा होऊ शकणारी अशी प्राकृतिक देणगी आहे. पंचज्ञानेंद्रिये व सहावें मन ही प्रत्यक्ष ज्ञानाची प्राकृतिसिद्ध अशी 'करणे' वा व्यापारवान् साधने होत. ही करणे नसतील तर ज्ञान संभवणारच नाही. प्रत्येक करणाने होणारे ज्ञान हे विशिष्ट स्वरूपाचेच असते. आणि एका करणाने वा इंद्रियाने होणारे ज्ञान दुसऱ्या इंद्रियाने होत नाही, ही देखील प्रकृतिसिद्ध अशीच गोष्ट आहे. जन्मांधाला रूपाचे ज्ञान अशक्यच आहे. बहिऱ्याला शब्दाचे ज्ञान अशक्यच आहे. आणि

डोळ्यांनी शब्द कळत नाही व कानाने रूप कळत नाही. सारांश, प्रत्यक्ष ज्ञान हे ज्ञानेंद्रियसापेक्ष असेंच असतें. इंद्रिये ही प्रत्यक्ष ज्ञानाची करणे वा प्रमाणे होत. इंद्रिये निर्दोष असली तरच प्रत्यक्ष ज्ञान यथार्थ होते. कावीळ झालेल्याला सारेच पिवळे दिसते. पण हे त्याचे प्रत्यक्ष ज्ञान असताहि ते यथार्थ नसते. कारण या ज्ञानाचे करण वा प्रमाण हे दूषित असते.

प्रत्यक्ष ज्ञान हा ज्ञानाचा एक प्रकार आहे. प्रत्यक्ष ज्ञानाखेरीज अनुमान व शब्द ही देखील प्रत्यक्षाइतकीच यथार्थ ज्ञानाची समर्थ साधने आहेत मात्र ही साधने निर्दोष असली तरच त्यांच्या साहाय्याने होणारे ज्ञान हे यथार्थ होऊ शकते

शुद्ध बुद्धिवादाचे स्वरूप

सुबुद्धपणा म्हणजे प्रमाणशुद्ध विचार करण्याची पात्रता आणि शुद्ध बुद्धिवाद म्हणजे निर्दोष प्रमाणाने जे सिद्ध होईल तेच ग्राह्य मानण्याची निश्चयात्मक वृत्ति. तथाकथित 'आधुनिक बुद्धिवाद' हा प्रमाण-प्रामाण्यविचार दुर्लक्षून, व्यक्ति-व्यक्तीच्या स्वैर मतांना अथवा वासनाजन्य विकारांना निर्बुद्ध महत्व देणारा वाद होय. असा 'बुद्धिवाद' हा सुबुद्धपणावर आधारलेला वाद नसून, निर्बुद्धपणाला व्यक्तिस्वातंत्र्याच्या व समतेच्या नावाखाली परमार्थ प्राप्त करून देण्याचा अट्टाहास करणारा तो हटवाद आहे.

या आधुनिक बुद्धिवादाने जनमनात प्रसृत केलेले व मान्यता पावलेले असंख्य भ्रम दूर सारण्याचा प्रयत्न या 'विचारांच्या विश्वा'त वारंवार करण्यात येईल. त्याचप्रमाणे यथार्थज्ञान म्हणजे काय, विचार कसा करावा, विचाराला काही मर्यादा आहेत का—इत्यादि प्रश्नावरहि प्रकाश पाडण्याचा प्रयत्न, प्रचलित प्रश्नांना अनुसरून करण्यात येईल.

हा पहिला लेख म्हणजे सलामीचा पहिला बाण आहे. सलामीला, वंदनाला, नमनाला, शुद्ध विचारात आद्य महत्त्वाचे स्थान आहे. आपण अपूर्ण आहोत, अल्पज्ञ आहोत, या जाणिवेतून जो नम्रभाव अंतःकरणांत स्फुरतो त्यातूनच आरंभाचा नमनविधि आकारास येतो. पूर्वाचार्यांचे व संत-सत्पुरुषांचे ग्रंथ नमनरूप मंगलाचरणानेच प्रारंभित होत असत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ज्याला आपल्या अपूर्णतेची, अल्पज्ञतेची जाणीव नसते तो मुक्त, पशु अथवा अभिजात मूढ, यापैकी कोणीतरी एक असतो. त्याच्यासाठी हा यत्न आरंभिलेला नाही हे प्रथमतःच सांगून टाकलेले बरे.

卐

खुलासा

'युगवाणी 'च्या दीपावली विशेषांकात (ऑक्टोबर-नोव्हेंबर १९५९) " भीष्म विवाहित की अविवाहित " हा पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर यांचा लेख प्रकाशित झाला. त्याबाबत खालील खुलासा करण्यात येत आहे.

(१) " उपकुर्वाणक ब्रह्मचर्य म्हणजे गुरुगृही अध्ययन संपवून, गुरूच्या आज्ञेने सोडमुंज करणे, प्रथमाश्रम संपुष्टात आणणे आणि शक्य तितक्या लवकर गृहस्थाश्रम पत्करणे; गृहस्थाश्रमात प्रवेश करीपर्यंतच्या मध्यंतरालाच उपकुर्वाणक ब्रह्मचर्य म्हणतात." हे बरोबर नाही. गुरुगृही गेल्यापासून विवाह करीपर्यंतच्या सर्व काळाला उपलक्षून उपकुर्वाणक ब्रह्मचर्याचा काल मानला जातो.

(२) " अश्वमेधशतैरिजे " हे शब्द महाभारतांतील श्रीकृष्णाच्या तोंडचे नसून श्रीकृष्णाच्या मूळ महाभारतातील शब्दांचा तो सार्थ अनुवाद आहे. श्रीकृष्णाच्या तोंडचे मूळ महाभारतातील शब्द येणेप्रमाणे आहेत :

" स एषः भीष्मः कुरुवंशकेतुर्
येनाहृतास्त्रिशतं वाजिमेधाः ॥

(विद्यासागर पी. पी. एस्. शास्त्री संपादित महाभारतप्रत, भीष्मपर्व, अध्याय २१, श्लोक १५)—भीष्मांनी तीनशे अश्वमेध यज्ञ केले होते असा याचा अर्थ आहे.

(३) लेखाच्या पान १५६ वरील मजकुरात " तथाच अयम् विवाहत्व व्याप्य···" या ऐवजी " तथाच अयम् विवाहवत्वव्याप्य" असे पाहिजे. आणि पान १५५ वरील 'आश्रमादाश्रमं गच्छेत्' हा श्लोक गीतेतील नसून श्रीमद् भागवतातील आहे.—

हा खुलासा पं. सीतारामशास्त्री याच्या सांगण्यावरून करण्यात येत आहे.

—संपादक

* *

'युगवाणी'च्या गेल्या दीपावलि विशेषांकात डॉ. अ. ना. देशपांडे यांनी लिहिलेले श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'आहुति' नामक नव्या कादंबरीचें परीक्षण प्रसिद्ध झाले आहे. त्या कादंबरीचे प्रकाशक श्री. घुमाळ, नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, हे आहेत व पुस्तकाची किंमत रु. ४/—आहे.

—संपादक

साभार पोच

पुस्तकें

१. आश्विनाचं ऊन
२. पानदान
३. राजविद्या
४. हद्दपार—मौज प्रकाशन, मुंबई
५. सुलभा— ,, ,, ,,
६. मुक्तामाला—प्रकाशक : कमलाबाई भिडे
७. हिंदु धर्म काय शिकवितो ?—प्रकाशक गं. रं. भडभडे
८. धुळीचे कण—लेखिका—सौ. सुमतीदेवी धनवटे
९. पॅरिस येथील अब्दुल बहांची कांही वक्तव्यें
१०. रेक्वीयम—लेखक—द. भि. कुळकर्णी; किं. २ रु. २५ न. पै.
११. असिधारा—लेखक—दे. गो. उदापुरे; किं. ३ रु.
१२. जोगवा—लेखक—आरती प्रभु; किं. ३ रु. ५० न. पै.
१३. वाटचाल—लेखक—न. रा. घुळधर, किं. ३ रु.
१४. प्राचीन भारतीय कला इतिहास व रूपदर्शन;
लेखक—रा. शं. वाळिंबे; किं. ६ रु.

दिवाळी अंक

१. सत्यकथा—मुंबई
२. केसरी—पुणे
३. विवेक—मुंबई
४. नवयुग—मुंबई
५. मनोहर—पुणे, रौप्य महोत्सव विशेषांक
६. रहस्यरंजन—मुंबई
७. स्त्री—पुणे

८. प्रसाद—पुणे
९. महाराष्ट्र—नागपूर
१०. सिनेन्यूज--नागपूर
११. युगधर्म--नागपूर
१२. साधना--पुणे
१३. आलमगीर--मुंबई
१४. सुषमा--नागपूर
१५. किर्लोस्कर—पुणे
१६. साहित्य लक्ष्मी--मुंबई
१७. स्वदेश--यवतमाळ
१८. पुरुषार्थ—पारडी
१९. उद्यम--नागपूर
२०. सन्मति--बाहुबलि
२१. सरस्वती--मुंबई
२२. तरुणभारत--नागपूर व पुणे
२३. दीपलक्ष्मी—मुंबई
२४. चित्रमयजगत्--पुणे
२५. लोकमत--यवतमाळ
२६. विविधवृत्त--मुंबई
२७. धनुर्धारी--मुंबई
२८. अनुवाद--मुंबई
२९. प्रतिष्ठान—औरंगाबाद
३०. गुरुदेव--गुरुकुंज मोझरी
३१. नवभारत--मुंबई
३२. जीवनविकास--नागपूर
३३. मौज--मुंबई
३४. श्री--नाशिक
३५. अमृत--नाशिक

卐

अज्ञान, ज्ञान, विज्ञान

"ज्याने दुधाविषयी केवळ ऐकले आहे तो 'अज्ञानी'. ज्याने दूध पाहिले आहे त्याला 'ज्ञान' झाले आहे. आणि जो दूध पिऊन धष्टपुष्ट झाला आहे त्याला 'विज्ञान' लाभले आहे."

★ ★

"ऋषींचा धर्म हा सनातन आहे. अनंतकालापासून आहे आणि अनंतकाल राहील. या सनातन धर्मात निराकार; साकार सर्व प्रकारच्या पूजा आहेत; ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग वगैरे सर्वच मार्ग आहेत. बाकीचे आजकाल उत्पन्न झालेले पंथ, संप्रदाय कांही दिवस राहतील आणि मग नाहीसे होतील."

—श्रीरामकृष्ण परमहंस

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस वि. सा. संघ, याजकडून

वि. सा. संघ शाखापदाधिकारी संमेलन

रविवार दि. १५-११-१९५९ रोजी अकोला शाखेच्या वतीने संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली द्वितीय शाखापदाधिकारी संमेलन भरविण्यात आले. यावेळी नागपूर आणि अमरावती, पुलगाव, खामगाव, चांदा, तळोधी, वर्धा व अकोला येथील शाखांचे एकूण १९ प्रतिनिधि उपस्थित होते.

रविवारला सकाळी ८-३० वाजता संमेलनास सुरवात झाली. सुरुवातीला सर्व शाखांच्या प्रतिनिधींनी आपापल्या शाखेचा वार्षिक अहवाल सभेला सादर केला. त्यानंतर परस्पर विचारविनिमय होऊन पहिली सभा संपली.

शाखापदाधिकारी संमेलनाच्या प्रतिनिधींची दुसरी सभा दुपारी ४-३० वाजता आमदार श्री. मधुसूदन वैराळे यांचे निवासस्थानी भरली. यावेळी अनौपचारिकपणे विचारविनिमय होऊन केंद्रीय कार्यालय आणि इतर शाखा यांच्या कार्यवृद्धीच्या दृष्टीने विचार करण्यांत आला.

रात्री ९-३० वाजता नाटचकला मंदिर, अकोला या संस्थेने "पैसे झाडाला लागतात" ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला. प्रयोग अतिशय सुंदर झाला. शाखापदाधिकारी संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. अनिल मराठे, श्री. शांताराम जैन, आ. मधुसूदन वैराळे, श्री. प्र. ना. खोडे आणि इतर सदस्य यांनी फार परिश्रम घेतले.

* *

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा

शाखापदाधिकारी संमेलनाचे वेळी दि. १५-११-१९५९ ला केंद्रीय कार्यकारी मंडळाची ६ वी सभा आकोला येथे भरली. यावेळी

(१) मागील सभेचा अहवाल वाचून दाखविण्यात आला.

(२) सावरगाव (जि. बुलढाणा) येथे होणाऱ्या साहित्य संमेलनात किंवा इतर वेळी विदर्भातील ज्येष्ठ साहित्य व समाजसेवकांचा सत्कार करण्यात यावा, असे ठरले.

(३) श्री. गं. रा. कोकर्डेकर यांची आजाराची अतिरिक्त रजा मंजूर करण्यात आली.

(४) U. S. I. S. यांचेतर्फे होणारा 'डान्स ज्युबिली'चा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाने घडवून आणावा असे ठरले व त्याप्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चासाठी कार्यकारी मंडळाने आवश्यक ती रक्कम मंजूर केली.

(५) ब्रिटिश कौन्सिल यांचेतर्फे होणाऱ्या नाटयप्रयोगाचा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाने घडवून आणावा असे ठरले व त्याकरिता लागणाऱ्या खर्चाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली.

(६) सावरगाव येथे भरणारे २२ वे साहित्य संमेलन फेब्रुवारी ६० च्या पहिल्या आठवडयात घडवून आणावे, असे ठरले.

(७) संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी पुढील नावे सुचविण्यात आली. यापैकी एकाची निवड सावरगाव येथील स्वागतमंडळाने करावयाची आहे. १. श्री. ना. रा. शेंडे, २. प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, ३. श्री. वा. ना. देशपांडे.

(८) विश्वस्तांकडील हिशेब तपासण्यासाठी हिशेबनीस म्हणून श्री. महेश्वर गद्रे आणि कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट, यांची नियुक्ति करण्यात आली.

(९) रंजन कलामंदिर, नागपूर ही संस्था विदर्भ साहित्य संघाची संलग्न संस्था म्हणून नोंदविण्यास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली.

(१०) सभासदत्वासाठी आलेली नवीन ३५ आवेदनपत्रे मंजूर करण्यात आली.

(११) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

(अ) सावरगाव येथील जीवन विकास सहकारी समिति लिमिटेड ही संस्था विदर्भ साहित्य संघाची संलग्न संस्था म्हणून नोंदविण्यात आली आहे.

(ब) चांदा शाखेची कार्यकारी मंडळाची निवडणूक अध्यक्षांनी घडवून आणावी, असे ठरविण्यात आले.

★ ★

अनुक्रमणिका

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

(१) म. ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या वतीने दि. २८-११-५९ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख वक्ते म्हणून श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे व्याख्यान झाले. ह्याचवेळी सुरवातीला कै. चिंतामणराव कोल्हटकर, कै. सदाशिवराव अळतेकर, व कै. पार्श्वनाथ अळतेकर यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली.

(२) यु. एस्. आय्. एस्. यांचा डान्स ज्युबिलीचा कार्यक्रम

अमेरिकेचे अध्यक्ष श्री. आयसेनहॉवर यांच्या सांस्कृतिक कार्यक्रम-योजने-खाली भारतात आलेल्या रॉड अलेक्झांडर यांच्या जगप्रसिद्ध डान्स ज्युबिली कलापथकाचे दोन कार्यक्रम शनिवार दि. २८ व रविवार दि. २९-११-५९ रोजी रात्रौ ९-३० वाजता धनवटे रंगमंदिरात करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन वि. सा. संघ व यु. एस्. आय्. एस्. यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

दि. २८-११-५९ ला न्यायमूर्ति श्री. एस्. पी. कोतवाल यांनी ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात गेल्या ८० वर्षांत अमेरिकेत विकसित झालेल्या नृत्यांचे व संगीताचे बहारदार दिग्दर्शन करण्यात आले होते. हे प्रयोग नागपुरांत अत्यंत लोकप्रिय झाले.

दि. २९-११-५९ रोजी दुपारी ३-३० वाजता 'डान्स ज्युबिली' कलापथकातीलसर्व कलावंतांचा सन्मान विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आला. सुरवातीला भारतीय नृत्य व संगीताचे लहानसे प्रात्यक्षिक करण्यात आले. त्यात पुढील कलाकारांनी भाग घेतला.

भावगीत—कु. कुमुद मोघे

शास्त्रीय संगीत--प्रा. अ. के. कोकजे

मणिपुरी नृत्य—१. कु. उषा जगन्नाथन, २. कु. सुजाता सरमन, ३. कु. जोस कोतवाल.


वाद्यवृंद—कलाकुंज, नागपूर.

कोरकु नृत्य—लेडी अमृताबाई डागा कॉलेजमधील विद्यार्थिनींनी सादर केले. त्यानंतर हारसमर्पण व चहापानाचा कार्यक्रम झाला. शेवटी प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

★ ★

अनुक्रमणिका

अमेरिकन कलापथकाचे विमान तळावर
विदर्भ साहित्य संघातर्फे स्वागत



(Photo by Godbole Arts)

अमेरिकन डान्स ज्युबिली पथक दि. २६–११–५९ रोजी नागपूर
विमानतळावर उतरले त्यावेळचे छायाचित्र.

मध्यभागी वि. सा संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व दोन्ही बाजूंना
रॉड अलेक्झांडर व जॅमसे डी लापे आणि उजवीकडील टोकास
सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर व डावीकडील टोकास
चिटणीस श्री. य. गो. मालोदे उभे आहेत.

अनुक्रमणिका

रंगमंदिर समिति

'कै. चन्द्रभागाबाई पारधी' सभागृहाचे उद्घाटन

डॉ. कालिदास मोरेश्वर पारधी, सेवानिवृत्त, सिव्हिल सर्जन, ब्रह्मदेश, यांनी विदर्भ साहित्य संघाला ५ हजार रुपयाची देणगी दिली असून ह्या देणगी-मधून धनवटे रंगमंदिरातील एक दालन बांधण्यात आले. या दालनाला "कै. चंद्रभागाबाई पारधी सभागृह" असे नाव देण्यात आले असून, या सभागृहाचे उद्घाटन बुधवार दि. ४-११-५९ रोजी सकाळी ८-३० वाजता डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. पारधी, त्यांचे वडील कै. डॉ. मो. ग. पारधी, मातोश्री कै. चंद्रभागाबाई पारधी आणि पत्नी सौ. सुशिलाबाई पारधी यांच्या तैलचित्रांचे अनावरण करण्यात आले. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे व उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी भाषणे केली.

★ ★

नवीन आजीव सभासद

कु. मंदाकिनी नागेश सहस्रबुद्धे, नागपूर, रु. ५०

★ ★

वर्धा शाखा

प्रा. ना. सी. फडके यांचे व्याख्यान

विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखा व कलाविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८-११-५९ रोजी प्रा. ना. सी. फडके यांचे 'ललित साहित्याचा हेतु व प्रतिज्ञा' ह्या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी श्री. सुरडकर, जिल्हाधीश होते. सुरवातीला वि. सा. संघ वर्धा शाखेचे अध्यक्ष प्रा. वनमाली यांनी सुरवातीला वक्त्यांचा व श्री. मशानकर यांनी संस्थांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रा. फडके यांचे अत्यंत सुश्राव्य व्याख्यान झाले. व्याख्यानासाठी जमलेल्या स्त्रीपुरुषांनी स्वावलंबी विद्यालयाचे पटांगण फुलून गेले होते.

卐

अनुक्रमणिका

डान्स ज्युबिली मधील एक नृत्य



(Photo by Godbole Arts)

जॅमसे डी लापे व रॉड अलेक्झांडर

हें मासिक श्री. **पुरुषोत्तम दिवाकर ढवळे,** यांनी वि. सा. संघाकरिता नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.